# प्रकरण ६.
# मुलभूत अधिकार / मार्गदर्शक तत्त्वे /कर्तव्य

| | भाग तिसरा : मुलभूत अधिकार |
|---|---|
| १२ | व्याख्या |
| १३ | मूलभूत अधिकारांशी विसंगत असलेले अथवा त्याचे न्यूनीकरण करणारे कायदे |
| १४ | समानतेचा मूलभूत हक्क |
| १५ | धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरुन भेदभाव करण्यास मनाई |
| १५ (५) | खाजगी शिक्षण संस्थात आरक्षण (९३ व्या घटनादुरुस्ती नुसार) |
| १६ | सार्वजनिक सेवेत समान संधी |
| १७ | अस्पृश्यता नष्ट करणे. |
| १८ | किताब नष्ट करणे. |
| १९ | स्वातंत्र्याचे अधिकार व त्यांचे संरक्षण |
| २० | अपराधांबद्दलच्या दोषसिध्दीबाबत संरक्षण |
| २१ | जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण |
| २१ अ | ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण |
| २२ | अटक व स्थानबध्दतेपासून संरक्षण |
| २३ | शोषणाविरुध्द अधिकार – माणसांचा अपव्यापार व वेठबिगारीस मनाई |
| २४ | कारखान्यामध्ये बालकांना कामाला ठेवण्यास मनाई |
| २५ | धर्मस्वातंत्र, धर्माचे आचरण व प्रसार |
| २६ | धर्मविषयक व्यवहारांचे स्वातंत्र |
| २७ | एखाद्या विशिष्ट धर्माच्या संवर्धनाकरिता देणगी देण्याबाबत स्वातंत्र |
| २८ | शैक्षणिक संस्थांत धार्मिक शिक्षण / उपासनेस उपस्थित राहण्याचे स्वातंत्र |
| २९ | सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार, अल्पसंख्याकांच्या हितसंबंधांचे संरक्षण |
| ३० | अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापण्याचा, प्रशासन करण्याचा अधिकार |
| ३१ | **(निरसित) ४४ वी घटनादुरुस्ती - १९७८** |
| ३१ अ | संपत्तीचे संपादन, इत्यादींकरता उपबंध करणाऱ्या कायद्यांची व्यावृत्ती |
| ३१ ब | विवक्षित अधिनियम विधिग्राह्य करणे. |
| ३१ क | निर्देशक तत्त्वे अमलात आणणाऱ्या कायद्यांची व्यावृत्ती |
| ३१ ड | **(निरसित)** |
| ३२ | **घटनात्मक उपाय योजनांचा अधिकार** |
| ३३ | तिसऱ्या भागातील अधिकार हे सेना, इ.ना लागू करताना, त्यात परिवर्तन करण्याचा संसदेस अधिकार |
| ३४ | एखाद्या क्षेत्रात लष्करी कायदा अमलात असताना तिसऱ्या भागाने प्रदान केलेल्या अधिकारांवर निर्बंध |
| ३५ | तिसऱ्या भागांची अंमजबजावणी करण्यासाठी विधिविधान |

- मूलभूत हक्क अमेरिका आणि फ्रान्स यांच्याकडून भारतीय राज्यघटनेत घेण्यात आले.
- मूलभूत हक्कांचे स्वरुप नकारात्मक व सकारात्मक आहे. राज्याने काय करु नये याबाबतचे विवेचन त्यांमध्ये असल्याने त्यांचे स्वरुप नकारात्मक आहे.

❖**मूलभूत अधिकार – (भाग तिसरा, १२ ते ३५ कलम)** भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या विभागात मूलभूत हक्क देण्यात आले आहेत. १२ ते ३५ ही कलमे मूलभूत हक्कासंबंधीची आहेत. नागरिकांचे मूलभूत हक्क ही शासनाच्या अधिकार क्षेत्राची मर्यादा असते. नागरिकांना असणारे मूलभूत हक्क हे लोकशाहीचे आधारभूत तत्त्व आहे. लोकशाही देशात मूलभूत हक्क घटनेमध्ये नमूद केलेले असतात. त्यामुळे या हक्कांना स्पष्टता येते. तसेच या हक्कांना घटनात्मक संरक्षण दिलेले असते. म्हणजेच या हक्कांवर शासनाकडून, शासकीय अधिकाऱ्यांकडून किंवा इतर कोणाकडून अतिक्रमण झाल्यास त्याविरुध्द न्यायालयात दाद मागता येते. भारताच्या घटनेनेसुध्दा मूलभूत हक्कांना या प्रकारचे संरक्षण दिलेले आहे.

- भारताच्या घटनेमध्ये मुळात एकूण सात प्रकारचे हक्क देण्यात आलेले होते, पण ४४ व्या घटनादुरुस्तीनुसार मालमत्तेचा हक्क मूलभूत हक्कांमधून वगळून तो घटनेमध्ये इतरत्र देण्यात आला आहे. त्यामुळे आता एकूण मूलभूत हक्क हे सहा प्रकारचे आहेत. मूलभूत अधिकारावर आक्रमण झाल्यास त्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते.

## ➢कलम १२ : राज्याची व्याख्या : 'राज्य म्हणजे या ठिकाणी देश असा अर्थ अभिप्रेत आहे. या देशाच्या नैसर्गिक सीमाच्या अंतर्गत असणाऱ्या सर्व संस्था जसे, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था'.

१) भारताचे शासन व संसद
२) घटकराज्य शासन व विधीमंडळ
३) सर्व स्थानिक प्राधिकारी जसे नगरपालिका,पंचायती, जिल्हा परिषद इत्यादी.
४) भारताच्या राज्यभूमितील किंवा राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली असलेले सर्व प्राधिकारी
**अपवाद** - १) सहकारी संस्था जसे - BCCI

## ➢कलम १३ :

- 'मुलभूत अधिकाराशी विसंगत असणारे कायदे रद्द करण्याचा अधिकार. असा अधिकार सर्वोच्च न्यायालयास आहे.
- न्यायिक पुनर्विलोकनाच्या तत्वज्ञानाची तरतूद (Doctorine of Judicial Review)
- मुलभूत हक्कांशी विसंगत असलेले अथवा त्यांचे न्युनीकरण करणारे कायदे (Laws inconsistent with fundamental Rights)
- राज्यसंस्थेची कोणतीही कृती (कायदा) (संसद / विधीमंडळ)
- नागरिकांचे मूलभूत हक्क काढून घेत असेल तर ही कृती घटनाविरोधी (बाद) हरवण्याचा किंवा तो उल्लंघन जेवढया प्रमाणात झाले आहे तेवढया प्रमाणात शुन्यवत (Void) असेल.
- असा अधिकार न्यायालयाला असेल.
  - ✓ सर्वोच्च न्यायालयाला - (कलम ३२ नुसार)
  - ✓ उच्च न्यायालयाला - (कलम २२६ नुसार) प्राप्त झाले आहेत.
- जेवढया प्रमाणात कृती कायदा घटनाविरोधी असेल तेवढयाच प्रमाणात 'कायदा' या शब्दाची व्यापक व्याप्ती [कलम १३(३) अन्वये]
  १) कायमस्वरुपी कायदा : संसद / राज्य विधीमंडळांनी केलेले
  २) तात्पुरते कायदे : राष्ट्रपती / राज्यपालांनी काढलेले अध्यादेश
  ३) वैधानिक कार्यकारी विधिनियम - उदा. आदेश, पोट - नियम, नियम, नियमने, अधिसुचना इ.
  ४) कायद्याचे गैरविधीक स्त्रोत - उदा. कायद्याची शक्ती असलेल्या रुढी किंवा परिपाठ
    - ✓ (एखाद्या Iilegal कायदा करता येणार नाही) - केला तरी मूलभूत हक्क काढता येत

- कलम १३ (४) - अन्वये

मात्र केशवानंद भारती खटल्यामध्ये (१९७३)
↓
सर्वोच्च न्यायालयाने → मुलभूत हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या घटनादुरुस्ती कायद्यालाही न्यायालयात आव्हान देता येऊ शकेल.
↓
कारण मूलभूत हक्क हे घटनेच्या मूलभूत संरचनेचा हिस्सा आहेत आणि असा कायदा घटनाविरोधी घोषित करता येईल.

मुलभूत हक्कांविरुद्ध घटनादुरुस्ती कायदा → घटनाविरोधी ठरविता येतील
(केशवानंद भारती खटला १९७३)

- मूळ मूलभूत हक्क हे १४ ते ३२ कलमांदरम्यान आहे. पुढीलप्रमाणे :-

| | | | |
|---|---|---|---|
| **समतेचा हक्क** (Right of Equity) - | १४ ते १८ | **धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क** (Relilgion Freedom) - | २५ ते २८ |
| **स्वातंत्र्याचा हक्क** (Right of Freedom) – | १९ ते २२ | सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार (Education & Cultural Right) – | २९ ते ३० |
| **शोषणाविरुध्दचा अधिकार** (Right against explotion) – | २३ ते २४ | घटनात्मक उपाययोजनांचा अधिकार (Constitutional Remidies) - | कलम ३२ |

- मूळ घटनेत ३१ व्या कलमात संपत्तीचा मूलभूत हक्क समाविष्ट होता. त्यामुळे मूलभूत हक्कांची संख्या ७ होती.
- १९७८ मध्ये झालेल्या ४४ व्या घटनादुरुस्तीने ३१ वे कलम रद्द झाले. त्यामुळे सध्या मूलभूत हक्कांची संख्या ६ आहे. व ते कलम ३०० अ मध्ये समाविष्ट करुन संपत्तीचा हक्क हा मुलभूत हक्क वगळून 'कायद्याने हक्क' असा करण्यात आला.

## ❖समतेचा हक्क (Right of Equity) – (कलम १४ ते १८) :-

- सामाजिक, आर्थिक, राजकीय समता प्रस्थापित करणे हा मुख्य उद्देश.
- कायद्यापुढे समानता, भेदभाव प्रतिबंध, समान संधी, अस्पृश्यतेवर बंदी, पदव्यांची समाप्ती. कलम १४ नुसार, राज्यसंस्था, कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यासमोर समानता किंवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही. हा मूलभूत हक्क भारताचे नागरिक तसेच परकीय व्यक्तींनाही प्राप्त आहे. तसेच त्यातील 'व्यक्ती' या शब्दोल्लेखामध्ये कायदेशीर व्यक्तींचाही समावेश आहे, जसे वैधानिक महामंडळे, कंपन्या, नोंदणीकृत सोसायटया किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या कायदेशीर व्यक्ती. या हक्कात समाविष्ट असलेला 'कायद्यासमोर समानता' हा हक्क ब्रिटनच्या घटनेवरुन, तर 'कायद्याचे समान संरक्षण' हा हक्क अमेरिकन घटनेवरुन घेण्यात आला आहे.

### ❑ कलम – १४ कायद्यासमोर समानता :- (प्रा. ए. व्ही. डायसी)

- अर्थ : 'कायद्यासमोर समानता' या हक्कातून पुढील अर्थ प्रतीत होतात.
  १) कोणताही व्यक्ती (श्रीमंत किंवा गरीब, उच्च किंवा निम्न, सरकारी किंवा गैर – सरकारी) कायद्याच्या वर नसणे.
  २) देशातील न्यायालयांमार्फत प्रशासित केला जाणारा साधारण कायदा सर्व व्यक्तींना सारख्या प्रमाणात लागू असणे.
  ३) कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही प्रकारचे विशेषाधिकार नसणे. हा मुळ ब्रिटीश विचार आहे.

### ❑ कायद्याचे समान संरक्षण :-

- अर्थ : 'कायद्याचे समान संरक्षण' या हक्कातून पुढील अर्थ प्रतीत होतात:
  १) समान परिस्थितीत समान वागणूक (कायद्याने प्रदान केलेल्या अधिकारांच्या तसेच जबाबदाऱ्यांच्या बाबतीत)
  २) समान परिस्थितीतील सर्व व्यक्तींना एक कायदा समान प्रकारे लागू करणे. म्हणजेच भिन्न परिस्थितीतील व्यक्तींना एखादा
  कायदा भिन्नपणे लागू करणे.
  ३) सारख्यांना कोणत्याही भेदभावाविना सारखे म्हणूनच वर्तवणूक देणे.
- अशा रीतीने, 'कायद्यासमोर समानता' ही एक नकारात्मक संकल्पना आहे तर 'कायद्याचे समान संरक्षण' ही एक सकारात्मक संकल्पना संकल्पना आहे. मात्र, दोन्हीही हक्क कायदेशीर दर्जा, संधी व न्याय यांची समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात.
- **अपवाद** :- राष्ट्रपती व राज्यपाल ह्यांना लागू नाही व इतर विशेष अधिकार प्राप्त व्यक्ती.

## ➢ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यावरुन भेदभाव केला जाणार नाही:-

- कलम १५(१) नुसार, राज्यसंस्था, कोणत्याही नागरिकाबाबत केवळ, धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या किंवा यांपैकी कोणत्याही कारणावरुन भेदभाव करणार नाही.
- कलम १५(२) नुसार, कोणत्याही नागरिकावर केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या किंवा यांपैकी कोणत्याही कारणावरुन पुढील बाबतीत कोणतीही नि: समर्थता, दायित्व, निर्बंध किंवा अटी लागू केल्या जाणार नाहीत.
- १५ (३) वरील तरतूद स्त्रिया व मूले यांच्या कल्याणासाठी विशेष तरतूद करण्यापासून राज्यसंस्थेला रोखणार नाही. म्हणजे राज्य या घटकांसाठी काही विशेष तरतूदी करु शकते. कलम (१५(३))

### ❑ अपवाद :-

१. १५ (४) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास नागरिकांसाठी देखील राज्य विशेष तरतूदी करु शकेल.
२. १५ (५) सामाजिके व शैक्षणीक दृष्टया मागास व SC/ST – शिक्षण संस्थेत प्रवेशासाठी नियम
३. १५ (६) १०२ **वी घटनादुरुस्तीनुसार आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीयांना आरक्षण**

**कलम १५ मधील घटनादुरुस्त्या :-**

१) १९५१ सालच्या पहिल्या घटनादुरुस्तीने उपकलम (४) चा समावेश करण्यात आला.
२) ९३ व्या घटनादुरुस्तीने (२००५) उपकलम (५) चा समावेश करण्यात आला.

## ➢ कलम १६ : सार्वजनिक रोजगारामध्ये समान संधी :-

- कलम १६(१) नुसार, राज्यसंस्थेच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावरील रोजगार किंवा नेमणुकीसंबंधी बाबींमध्ये सर्व नागरिकांना समान संधी असेल तर कलम १६(२) नुसार, कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान, निवास यांपैकी कोणत्याही कारणांवरुन सरकारी रोजगार किंवा पदासाठी अपात्र असणार नाही. अथवा त्यांच्याबाबतीत भेदभाव केला जाणार नाही. कलम १६(३) संसद कायद्याने राज्यातील किंवा केंद्रशासित प्रदेशातील सरकारी नौकरी साठी अधिवासाची (domicile) ची अट घालू शकते (आंध्रपदेश वगळता) कलम १६(४) मागासवर्गाचे योग्य प्रतिनिधित्व नसेल तर त्यासाठी नेमणूक पदामध्ये जागा राखून देवू शकते. ४ (अ) - SC / ST - पदोन्नती राखून ठेवले येते - ७७वी घटनादुरुस्ती, ४ (ब) आरक्षित जागा एखाद्या वर्षी भरल्या न गेल्यास तर पुढील वर्षी त्यांचा एक स्वतंत्र वर्ग म्हणून विचार केला जाईल. अशा जागा त्या वर्षीच्या ५०% इतकी आरक्षण मर्यादा आहे असे गृहीत धरण्यासाठी नसतील. (घटनादुरुस्ती ८ वी २००० साल कलम १६(५) कायद्यानुसार स्थापीत झालेल्या कोणताही संख्या किंवा कार्यकारी परिषदेवर धार्मिकता व सांप्रदायीकताचा आधार घेऊन त्याच धर्माचा किंवा संप्रदायाचा अनुयायी व्यक्ती काम करेल अशी तरतूद करता येईल.

### ❑ अपवाद :-

१) राज्य काही मागासवर्गांच्या नागरिकांसाठी विशिष्ट पदे आरक्षित ठेवू शकते.

२) एखाद्या घटकराज्यातील शासकीय नोकऱ्यांच्या संदर्भात संसद कायदा करुन 'अधिवास' ही अट जाहीर करु शकते.

३) कलम ३३५ अंतर्गत प्रशासनातील कार्यक्षमतेच्या तत्त्वास बाधा येऊ न देता एखाद्या शासकीय क्षेत्राबाबतचा अनुसूचित जाती
व जमातींचा प्रतिनिधीत्वाचा दावा लक्षात घेऊन राज्य त्या क्षेत्रात त्या गटास योग्य सहभाग देऊ शकते.

### ❖ कलम १६ मध्ये झालेल्या घटनादुरुस्त्या :-

१) ७७ व्या घटनादुरुस्तीने (१९९५) कलम ४ 'अ' चा समावेश करण्यात आला.

२) ८१ व्या घटनादुरुस्तीने (२०००) कलम ४ 'ब' चा समावेश करण्यात आला.

३) ८५ व्या घटनादुरुस्तीने (२००१) कलम ४ 'अ' पुनर्स्थापित केले.

## ➢ कलम १७ : अस्पृश्यता नष्ट करणे :-

- कलम १७ अन्वये, 'अस्पृश्यता' नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरुपातील आचरण निषिध्द करण्यात आले आहे, 'अस्पृश्यतेतून' उध्दवणारी कोणतीही नि:समर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.
- सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळता येणार नाही.
- **उपाय** –

१) नागरी हक्क संरक्षण अधिनियम – १९५५,

२) अनुजाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा – १९८९

- कोणीही अस्पृशता पाळल्यास तसेच धार्मिक, सामाजिक, निसमर्थता लादत असेल तर त्याला - १ ते ६ महिने कारावास व १०० ते ५०० रु. दंड घेवू शकतो.

❑ **नागरी हक्काची व्याख्या** - नागरी हक्क संरक्षण अधिनियम - १९५५ मधील कलम २ मध्ये "भारतीय राज्यघटनेतील कलम १७ अंतर्गत अस्पृश्यता नष्ट करण्यात आल्यामुळे व्यक्तीस प्राप्त होणारा कोणताही हक्क होय.

## ➢ कलम १८ : किताब नष्ट करणे:-

- कलम १८ ने किताब नष्ट केले असून त्याबाबत चार तरतूदी केल्या आहेत:
  १) राज्यसंस्थेमार्फत, लष्करी व शैक्षणिक मानविशेष वगळता, कोणत्याही नागरिकास किंवा परकीय व्यक्तीस कोणताही किताब प्रदान केला जाणार नाही.
  २) भारताचा कोणताही नागरिक कोणत्याही परकीय देशाकडून कोणताही किताब स्वीकारणार नाही.
  ३) राज्यसंस्थेखालील कोणतेही लाभाचे किंवा विश्वासाचे पद धारण करणारा भारताचा नागरिक नसलेला व्यक्ती राष्ट्रपतीच्या संमतीशिवाय कोणत्याही परकीय देशाकडून कोणताही किताब स्विकारणार नाही.
  ४) राज्यसंस्थेखालील कोणतेही लाभाचे किंवा विश्वासाचे पद धारण करणारा नागरिक किंवा परकीय व्यक्ती राष्ट्रपतीच्या संमतीशिवाय परकीय देशाकडून कोणत्याही प्रकारची भेट, वित्तलब्धी किंवा पद स्वीकारणार नाही.

पुढील पदव्या रद्द केल्या आहेत.

१. महाराजा - राज बहादूर, राय बहादूर, राजसाहब , दिवाण बहादूर कारण हया पदव्या समतेच्या विरुद्ध होत्या.

- परंतु बालाजी राघवन x केंद्र सरकार चा खटल्यांचा निकाल देताना मा सर्वोच्च न्यायालयाने विद्या व गुणवत्ता व शौर्य पुरस्कार मान्य केले. जसे पद्मविभूषण, पद्मभूषण, भारतरत्न किमी चक्र इ. परंतु न्यायालयाने हेही स्पष्ट केले कि त्या व्यक्तीने ही पदवी आपल्या नावापुढे किंवा नावामागे लावू नये.
- राष्ट्रीय पुरस्कार सुरुवात १९५४ पदाने नेहरुंच्या कालखंडात झाली.
- १९७७ मध्ये मोरारजी देसाई सरकारने बंद केली - परंतु १९८० पासून इंदिरा गांधी सरकारने पुन्हा सुरु केले.

## ➢स्वातंत्र्याचा हक्क (Right of Freedom) – (कलम १९ ते २२)

- मुळ घटनेत ७ स्वातंत्र्य होते. परंतु पदवी घटना दुरुस्ती १९७८ नुसार संपत्ती संपादन करणे धारण करणे व विक्री करणे हा हक्क वगळला आहे.

| | |
|---|---|
| १) राजसंस्थेच्या कृती विरुद्ध संरक्षण | खाजगी व्यक्ती विरुद्ध नाही |
| २) केवळ भारतीय नागरिकांना उपलब्ध | परकियांना नाहीत. |
| ३) कंपनी भाग धारकांना आहेत. | कंपन्या महामंडळे यासारख्या कायदेशीर व्यक्तींना नाहीत. |

### ❖सहा स्वातंत्र्ये -

**अ) भाषण व विचार स्वातंत्र्य** १९) -

- भारतीय व्यक्तीला आपले भाषण व विचार कोणत्याही माध्यमातून मांडता येतील परंतु संसदीय भाषेचा वापर कसे गरजेचे पुढील बाबी येतील :

  १) स्वत:ची किंवा इतरांची मते प्रदर्शित करणे. २) मुद्रण स्वातंत्र्य ३) व्यवसाय व व्यापाराची जाहीरात ४) टेलिफोन संभाषण टॅपिंग विरंद्धचा हक्क ५) प्रसारण करण्याचा अधिकार ६) कोणत्याही संघटनेचा बंद विरुद्धचा अधिकार ७) सरकारने कामकाज जाणून घेण्याचा अधिकार ८) शांततेचे स्वातंत्र्य ९) प्रदर्शीत करण्याचा अधिकार परंतु संपाचा अधिकार नाही. १०) योग्य कायदेशीर प्रक्रिया न करता कोणत्याही वृत्तपत्रावर प्रतिबंध घालण्याविरुद्ध अधिकार.

- भाषण व विचार स्वातंत्र्यांवर पुढील आधारे **बंधने** घालता येतात:

  १) देशाचे सार्वभौमत्व व अखंडत्व टिकवून ठेवण्यासाठी (हा आधार १६ व्या दुरुस्तीद्वारे १९६३ मध्ये समाविष्ट करण्यात आला.)
  २) राज्याची सुरक्षितता राखणे.
  ३) परकीय राष्ट्राशी मित्रत्वाचे संबंध ठेवणे.
  ४) सभ्यता व नैतिकता
  ५) गुन्ह्यास प्रवृत्त करणे.
  ६) सार्वजनिक सुव्यवस्था (१ ली दुरुस्ती, १९५१ द्वारे समाविष्ट)
  ७) बदनामी
  ८) न्यायालयाचा अपमान

### ब) निशस्त्र एकत्र येण्याचे स्वातंत्र्य

१) प्रत्येक नागरिकास शांततेने आणि विनाशस्त्र एकत्र जमण्याचा हक्क आहे. या नुसार सभा / निदर्शने / मोर्चा याबाबी करता येतात.

२) हा हक्क केवळ सार्वजनिक जागे बजावता येतो. यामध्ये संप करण्याचा अधिकार नाही.

- निशस्त्र एकत्र येण्याच्या स्वातंत्र्यावर पुढील आधारे बंधने घालता येतात :

- **कायद्यातील तरतूदी**

१. फौजदारी प्रक्रिया संहिता - १९७३ (CRPC) - कलम - १४४
२. मानवी जीवनास धोका
३. आरोग्य ा सुरक्षा
४. सार्वजनिक व्यवस्थेचा अडथळा
५. दंगल भडकवण्याचा धोका

६. या कारणावरुन कार्यकारी दंडाधिकारी असा जमाव बंदीचा आदेश देतात.
७. भारतीय दंड संहिता (IPC) - १८६० - कलम १४१ बेकायदेशीर जमाव - म्हणजे पाच किंवा पाच पेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येऊन देशातील कोणत्याही कायद्याविरुद्ध कृती करत असतील शिक्षा प्रावधान आहे.

- देशाचे सार्वभौमत्व व अखंडत्व टिकवून ठेवण्यासाठी (हा आधार १६ व्या दुरुस्तीद्वारे १९६३ मध्ये समाविष्ट करण्यात आला.)
- वाहतूक नियंत्रण

## क) संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य

सभा, संघटना, सहकारी सोसायटी स्थापन करण्याचा अधिकार आहे.
नकारारत्मक अधिकार - वरील घटकामध्ये सामील न होणे संघटनेला मान्यता मिळवण्याचा अधिकार यामध्ये नाही.
सर्वोच्च न्यायालयाच्या मते श्रमिक संघटनांना - वाटाघाटी करणे, संप करणे - किंवा ताळाबंदी अधिकार प्राप्त होत नाहीत.
घटना दुरुस्ती - ९७ वी २०११ बद्दल - सहकारी संस्था स्थापन करणे

- या स्वातंत्र्यावर उपरोक्त निर्बंधापैकी पुढील आधारे बंधने घालता येतात:

१) देशाचे सार्वभौमत्व व अखंडत्व टिकवून ठेवण्यासाठी (हा आधार १६ व्या दुरुस्तीद्वारे १९६३ मध्ये समाविष्ट करण्यात आला.)
२) नैतिकता
३) सार्वजनिक सुव्यवस्था (१ ली दुरुस्ती, १९५१ द्वारे समाविष्ट)

## ड) संचार स्वातंत्र्य

**संचार स्वातंत्र्य**

- भारतीय व्यक्ती देशाच्या कोणत्याही एक राज्यातून - दुसऱ्या राज्यात किंवा त्याच राज्यातील एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणावर मुक्तपणे संचार क्द्दइ
- हा अधिकार केवळ देशांतर्गत संचाराबद्दल लागू आहे.
- सर्वोच्च न्यायालय यांच्या मते वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिला यांच्यावर सार्वजनिक आरोग्य व नैतीकतेच्या आधारावर बंधने घालता येतात.
- मुंबई उच्च न्यायालय - एडस् बाधीत व्यक्तींना संचारामर्यादा वैध आहेत हे सांगितले आहे.
- या स्वातंत्र्यावर - १)सामान्य लोकांचे हित
  २)अनुसूचित जमातींच्या हिताचे रक्षण या आधारे बंधने घातली जातात.
  ३)राष्ट्राची सुरक्षा

## इ) वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य

भारतीय नागरिकांना देशात कोठेही वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य आहे

- सर्वोच्च न्यायालय यांच्या मते वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिला यांच्यावर सार्वजनिक आरोग्य व नैतीकतेच्या आधारावर बंधने घालता येतात.
- मुंबई उच्च न्यायालय - एडस् बाधीत व्यक्तींना मर्यादा वैध आहेत हे सांगितले आहे.

## फ) कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य

- प्रत्येक भारतीय नागरिकाला कोणताही व्यापार व्यवसाय करण्याचा अधिकार आहे. हे हक्क व्यापक असून त्यामध्ये उपजीविकेतचा सर्व साधनांचा समावेश होतो.
- कोणताही व्ययसाय, रोजगार, व्यापार वा धंदा करणे :- या स्वातंत्र्यावर (एक) सामान्य लोकांचे हित (दोन) एखाद्या पदासाठी विशिष्ट तांत्रिक कौशल्याची अट घालणे, एखादा धंदा अथवा व्यापारासंबंधी राज्याची मक्तेदारी निर्माण करणे यासाठी राज्याला कायदा करता येतो, या आधारे बंधने घालता येतात.
- १९(१) मध्ये संपत्ती मिळविण्याचे स्वातंत्र्य होते ते ४४ व्या घटनादुरुस्तीने रद्द केले.

## ➢ जीवीताचा हक्क व व्यक्ती स्वातंत्र्याची हमी – (कलम २० ते २२)

**कलम - २० अपराधच्या दोषसिद्धी बाबत संरक्षण**

- भारताचा नागरिक (परदेशी कंपनी वा परिषदाचे कायदेशीर व्यक्तींना सुद्धा अधिक शिक्षा व दंडापासून संरक्षण प्रदान करतो.
- २० - १) सध्या अस्तीचा असलेल्या कायद्याचा भंग केला तरच एखादी व्यक्ती दोषी असेल व त्यानुसारच शिक्षा होईल.
- (No EX Post facto law)
- २० – २) एकाच अपराधाबद्दल एकापेक्षा जास्त खटला चालवला जाणार नाही आणि एक पेक्षा जास्त शिक्षा दिली जाणार नाही.

**अपवाद –**

- **न्यायाधीकरण / न्यायालयासमोरील कार्यवाही यासाठी प्राप्त आहे. परंतु प्रशासकीय कार्यवाही विरुद्ध नाही.**
- **२० – ३) स्वत: विरुद्ध साक्षीदार होण्याची सक्ती नसेल.**
- २० ३) स्वत: विरुद्ध साक्ष देण्याची सक्ती नसणे.
- अपराधाचा आरोप असणाऱ्या कोणत्याही व्यक्तींवर स्वत:विरुद्ध साक्षीदार होण्याची सक्ती केली जाणार नाही.
- मौखिक व कागदपत्रावर आधारित साक्ष या बाबतीत लागु असेल.

**अपवाद -**

१) गुन्हेशी संबंधित वस्तु सादर करणेची सक्ती

२) रक्त नमुने, बोटांचे ठसे, नमुना स्वाक्षरी.

३) फौजदारी प्रक्रियेत हे संरक्षण आहे दिवाणी नाही.

❖**कलम २१ :-** नुसार, कायद्याद्वारे प्रस्थापित कार्यपध्दतीशिवाय कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही. हा हक्क नागरिक तसेच परकीयांनाही उपलब्ध आहे.

**दोन महत्त्वपूर्ण खटले व त्यावरील निकाल**

| १९५० - ए.के गोपालन y/s मद्रास सरकार | १९७८ मेनका गांधी y/s भारत सरकार |
|---|---|
| • कलम २१ हे अंतर्गत संरक्षण केवळ कार्यपद्धतीनेच असंगत कार्यकारी कृती विरुद्ध आहे.<br>• असंगत कायदेविषयक कृती विरुद्ध नाही.<br>• वैयक्तिक स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीच्या शरिराचे स्वातंत्र्य | • कायद्याने प्रस्थापित केलेल्या संयुक्तीक न्याय व योग्य जिवीत किंवा व्यक्तीगत स्वातंत्र्यापासून वंचीत करता येईल.<br>• यांचा अर्थ असा कि. हे संरक्षण कार्यकारी कृती व संसदीय कृती या दोन्ही विरुद्ध उपलब्ध आहे. |

मेनका गांधी खटल्यानुसार पुढील हक्क मान्य केले आहेत.

१) मानवी प्रतिष्ठा प्राप्त जीवन जगणे. २) स्वच्छ पर्यावरण - प्रदूषण रहित ३) जिवीतांचे रक्षण ४) एकांतवास ५) आश्रय ६) आरोग्य ७) १४ वर्षापर्यंत मोफत शिक्षण ८) मोफत कायदेविषयक सल्ला ९) एकत्र कोठडीमधील कारावास १०) तत्काळ सुनावणी ११) हाथकर्ण विरुद्ध १२) उशीरा फाशी विरुद्ध १३) विदेशी प्रवास १४) कोठडीमधील शोषण विरुद्ध १५) माहिती अधिकार १६) महिला आदरपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूक १७) सरकारी इस्पितळात वेळेत उपचार मिळणे. १८) निरपक्ष चौकशी १९) सार्वजनिक फाशी विरुद्ध २०) राज्याबाहेर जाण्याचा अधिकार

## ➢ घटनादुरुस्ती ८६ वी, २००२ :

राज्यसंस्था - ६ - १४ वयोगटातील मुलांना

मोफत व अनिवार्य शिक्षण उपलब्ध करुन देईल.

↓

अनिवार्यता

→ वडिलांना नाही

→ शासनावर आहे.

(शासनाने जास्तीत जास्त पयत्न करावे)

**८६ वी घटनादुरुस्ती २००२ (३ बदल)**

**मुलभूत हक्क बदल (भाग ३)**
↓
२१ (A) म्हणून नवीन कलम समाविष्ट प्राथमिक शिक्षण
↓
मुलभूत हक्क बनवण्यात आला.

**मार्गदर्शक तत्त्वे बदल (भाग ४)**
↓
पूर्वी कलम ४५ मध्ये मुलांसाठी मोफत व अनिवार्य शिक्षणाचे मार्गदर्शक तत्व समाविष्ट होते. मात्र मार्गदर्शक तत्त्वे न्यायप्रविष्ट नसतात.
↓
कलम ४५ च्या विषयात बदल
↓
( ० – ६ वर्ष ) त्यानुसार कलम
↓
राज्य हे बालकांचे वय सहा वर्षाचे होईपर्यंत त्यांचे संगोपन आणि शिक्षणासाठी तरतूद करेल.

**मुलभूत कर्तव्यात बदल (भाग ४A)**
↓
८६ व्या घटनादुरुस्तीने
↓
कलम ५१ A मध्ये मुलभूत कर्तव्य समाविष्ट भाग पूर्वी १० कलमे 'a to j' ११ 'k' म्हणून abc
↓
५१ 'k' कलम
↓
जो 'जन्मदाता' असेल किंवा 'पालक' असेल त्याने आपल्या अपत्यास किंवा पाल्यास (६-१४) वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असेल.

## ➢कलम २२ :- अटक व स्थानबध्दता यांपासून संरक्षण

- कलम २२ मध्ये अटक किंवा स्थानबध्द करण्यात आलेल्या व्यक्तीस काही मूलभूत हक्क प्रदान करण्यात आले आहेत.
- स्थानबध्दता दोन प्रकारची असते, शिक्षा म्हणून केलेली स्थानबध्दता (Punitive detention) व प्रतिबंधक (Preventive detention) स्थानबध्दता
- २४ तासाच्या आत न्यायालयासमोर उभे करावे.
- वकीलाचा सल्ला घेवू शकतात.
- शिक्षा म्हणून केलेली स्थानबध्दता ही खटला चालविल्यानंतर व अपराध सिध्द झाल्यानंतर केलेली स्थानबध्दता असते.
- याउलट, खटला न भरता व न्यायालयाने शिक्षा सुनावलेली नसतांनाही केलेली स्थानबध्दता म्हणजे प्रतिबंधक स्थानबध्दता होय. त्याचा उद्देश व्यक्तीने पूर्वी केलेल्या गुन्ह्यासाठी शिक्षा करणे हा नसून त्याला भविष्यात गुन्हा करण्यापासून रोखणे हा असतो. त्यामुळे प्रतिबंधक स्थानबध्दता केवळ संशयावर केलेली आगाऊ सावधगिरी असते.

**महत्त्वाचे प्रतिबंधात्मक स्थानबध्दता कायदे :-**

- १९५० चा प्रतिबंधक स्थानबध्दता कायदे :-
- १९७१ चा अंतर्गत सुरक्षा कायदा (मिसा)
- १९८० चा राष्ट्रीय सुरक्षा कायदा (रासुका)
- १९८५ चा दहशतवादी व फुटीर कारवाया प्रतिबंधक कायदा (टाडा) – २४ मे १९९५ ला रद्द.
- २००२ चा दहशतवादी प्रतिबंधक कायदा (पोटा)

<table>
<tr><th colspan="2">पोटो व पोटा<br>दहशतवाद्यांच्या वाढत्या कारवाया रोखण्यासाठी ‘टाडा’ सारखा एक नवा कायदा असावा असे वाजपेयींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारला वाटू लागले.</th></tr>
<tr><td>पोटो :<br>११ सप्टेंबर २००१ रोजी न्यूयॉर्कमधील जागतिक व्यापार केंद्राच्या गगनचुंबी इमारतींवर तसेच वॉशिंग्टनमधील पेंटॅगॉन या संरक्षण मंत्रालयाच्या मुख्य कार्यालयावर दहशतवाद्यांनी आत्मघातकी हवाई हल्ला चढवला. परिणामी दहशतवादाच्या समस्येने उग्ररुप धारण केल्याचा निष्कर्ष काढत. १५ ऑक्टोबर २००१ ला प्रिव्हेन्शन ऑफ टेररिझम ऑर्डिनन्सला (पोटो) वाजपेयींच्या मंत्रिमंडळाने मान्यता दिली.</td><td>पोटा :<br>लोकसभा व राज्यसभा यांच्यात मतभेद निर्माण झाल्यामुळे २४ ऑक्टोबर २००१ रोजी जारी केलेल्या ‘पोटो’चे रुपांतर ‘पोटा’मध्ये (प्रिव्हेन्शन ऑफ टेररिझम अ‍ॅक्ट) करण्यासाठी २६ मार्च २००२ रोजी राज्यसभा आणि लोकसभेची संयुक्त बैठक बोलावण्यात आली. ४२५ विरुध्द २९६ मतांनी या तिसऱ्या संयुक्त बैठकीत संसदेने ‘पोटा’ कायदा पारित केला. २४ ऑक्टोबर २००४ रोजी ‘पोटा’ची तीन वर्षांची मुदत संपल्यानंतर तो आपोआपच रद्द झाला कारण मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालच्या संयुक्त पुरोगामी आघाडीचा या कायद्यास सुरुवातीपासूनच विरोध होता. म्हणूनच या सरकारने ‘पोटा’ ला मुदतवाढ दिली नाही.</td></tr>
</table>

# शोषणाविरुध्द हक्क

## ➢ कलम २३ : माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी यांना मनाई :-

- कलम २३ अन्वये, माणसांचा अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्न स्वरुपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे आणि या तरतुदींचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल. यामध्ये व्यक्तीची खरेदी विक्री वस्तू म्हणून करणे. महिला व बालकांचा अनैतिक व्यापार, देवदासी प्रथा, अपव्यापार आणि वेठबिगारी
- हा हक्क नागरिक तसेच गैर – नागरिकांनाही उपलब्ध आहे. तसेच हा हक्क व्यक्तींना राज्यसंस्था तसेच खाजगी व्यक्तींविरुध्द संरक्षण उपलब्ध करुन देतो.
- उपाय - अनैतिकव्यापार (प्रतिबंधक) कायदा – १९५६, इमान मजूरी कायदा – १९४८, कामगार करार कायदा – १९७०

## ➢कलम २४ : कारखाने, इत्यादींमध्ये बालकांना कामाला ठेवण्यास मनाई :-

- कलम २४ नुसार, १४ वर्ष वयाखालील कोणत्याही बालकास, कोणत्याही कारखान्यात वा खाणीत काम करण्यासाठी नोकरीत ठेवले जाणार नाही अथवा अन्य कोणत्याही धोक्याच्या कामावर त्यास लावले जाणार नाही. यावरुन, हा कायदा धोक्याच्या नसलेल्या कामावर बालकास कामावर लावण्यास प्रतिबंध करत नाही.
- उपाय - बालकागार (प्रतिबंध व नियमन) कायदा – १९८०

## ➢कलम २५ : विवेकबुध्दीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रचार

- कलम २५ अन्वये, सर्व व्यक्तींना सद्सद्विवकेबुध्दीच्या स्वातंत्र्याचा आणि धर्म मुक्तपणे प्रकट करण्याचा, आचरण्याचा व त्याचा प्रसार करण्याचा हक्क सारख्याच प्रमाणात असेल.
- हा अधिकार परकीय नागरिकांना सुद्धा आहे.

## ➢कलम २६ : धर्मविषयक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य :-

- कलम २६ अन्वये, प्रत्येक धार्मिक संप्रदायास किंवा त्यातील गटास पुढील हक्क असतील:
  १) धार्मिक व धर्मदायी उद्देशाकरता संस्थांची स्थापना करुन त्या स्वखर्चाने चालविण्याचा हक्क
  २) धार्मिक बाबींमध्ये आपल्या व्यवहारांची व्यवस्था स्वत: पाहण्याचा हक्क
  ३) जंगम व स्थावर मालमत्ता स्वमालकीची असण्याचा व ती संपादन करण्याचा हक्क
  ४) कायद्यानुसार अशा मालमत्तेचे प्रशासन करण्याचा हक्क
- **बंधने** - सार्वजनिक सुव्यवस्था व निमीमत्ता आणि आरोग्य यांच्या आधिन राहून प्राप्त होतात.

## ➢कलम २७ : एखाद्या विशिष्ट धर्माच्या संवर्धनाकरता कर देण्याबाबत स्वातंत्र्य :-

- कलम २७ अन्वये, कोणत्याही व्यक्तीवर असा कर देण्याची सक्ती केली जाणार नाही, ज्याचे उत्पन्न एखाद्या विशिष्ट धर्माचे किंवा धार्मिक संप्रदायाचे संवर्धन करण्यासाठी खर्च करावयाचे आहे. ही तरतूद केवळ टॅक्स आकारण्यास प्रतिबंध करते शुल्क नाही. जसे - यात्रेकरुनना सुविधा देण्यासाठी शुल्क आकारण्यात येते.

## ➢कलम २८ :

### ❑ शैक्षणिक संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण किंवा धार्मिक उपासना यांना उपस्थित राहण्याबाबत स्वातंत्र्य :-

- कलम २८ अंतर्गत ३ तरतूदी आहेत :
  १) पूर्णत: राज्यसंस्थेच्या पैशातून चालवल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही.
  २) राज्यसंस्थेमार्फत प्रशासित केली जाणारी एखादी शैक्षणिक संस्था जर दाननिधी किंवा न्यास म्हणून स्थापन करण्यात आली असेल (जेथे धार्मिक शिक्षण आवश्यक आहे) तर तेथे धार्मिक शिक्षण दिले जाऊ शकेल.
  ३) शासनमान्य किंवा शासन - अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील कोणत्याही व्यक्तीला त्याच्या किंवा त्याच्या पालकाच्या (तो व्यक्ती अज्ञान असल्यास) संमतीशिवाय धार्मिक शिक्षण किंवा उपासनेमध्ये सहभागी होण्यास भाग पाडले जाणार नाही.

## ➢ सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार – (कलम २९ ते ३०) :-

### ❖ २९ व्या कलमानुसार,

१) भारतात कुठेही वास्तव्य करणाऱ्या भारतीय नागरिकांना स्वत:ची भाषा व संस्कृती जतन करण्याचा अधिकार आहे. हा अधिकार केवळ अल्पसंख्यांकांना नसून तो बहुसंख्यांकाना सुद्धा उपलब्ध असेल.
२) राज्याच्या खर्चाने किंवा आर्थिक मदतीने चाललेल्या शिक्षणसंस्थेत धर्म, वंश, जात व भाषा या कारणांवरुन कोणालाही प्रवेश नाकारता येणार नाही. या बाबी सोडून इतर बाबींसाठी प्रवेश नाकारला जाईल

### ❖ ३० व्या कलमानुसार,

१) धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांकांना स्वत:च्या निवडीनुसार शैक्षणिक संस्था स्थापण्याचा आणि चालविण्याचा हक्क आहे.४४ वी घटनादुरुस्ती १९७८ नुसार अल्पसंख्यांक शिक्षण संस्थेची मालमत्ता सक्तीने संपादन करता येईल. व त्याची पर्याप्त नुकसान भरपाई दिली जाईल.
२) शैक्षणिक संस्थांना साहाय्य देताना एखादी संस्था धार्मिक किंवा भाषिक अल्पसंख्यांकांनी चालविलेली आहे या कारणांवरुन राज्याला भेदभाव करता येणार नाही.

## ➢घटनात्मक उपाययोजना करण्याचा हक्क – (कलम ३२) :-

- राज्यघटनेतील ३२ व्या कलमानुसार, मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार प्राप्त होतो. अशी दाद मागितल्यास हक्कांच्या रक्षणासाठी आवश्यक ते आदेश देण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. व्यक्तीच्या हक्कांवर
  - १) दुसऱ्या व्यक्तीकडून
  - २) शासकीय अधिकाऱ्यांकडून किंवा
  - ३) कायदेमंडळाकडून अतिक्रमण संभवते. तसे झाल्यास सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागता येते आणि हक्कभंग झालेला आहे अथवा नाही हे ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला असतो.
- मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाने काढलेल्या आदेशास 'रिट्स' म्हणतात. या आदेशांना निर्देश किंवा प्राधिलेख असेही म्हटले जाते.
- ५ प्रकारचे रिट्स या अंतर्गत न्यायालय देऊ शकते.
- मुलभूत हक्क बजावण्यासाठी सर्वोच्च न्यायालय कलम ३२ अंतर्गत तर उच्च न्यायालय २२६ अंतर्गत प्राधिलेख काढू शकते. (१९५० पूर्वी केवळ कलकत्ता, बॉंबे मद्रास उच्च न्यायालयांना प्राधिलेख काढण्याचा अधिकार होता) अशा प्राधिलेखांमध्ये हॅबियर्स कॉपर्स, मॅंडमस, प्रोहिबिशन, सर्शिओराराय आणि को वारंटो यांचा समावेश होतो.
- या कलमातील तरतुदीनुसार कलम २२६ व कलम २२७ अंतर्गत अर्ज करता येतो.

### १) देहोपस्थिती / बंदी प्रत्यक्षीकरण (Writ of Habeas corpus) :-


- अर्थ : सदेह उपस्थित राहणे : पोलिस अधिकाऱ्याने जर एखाद्याला अटक केली असेल आणि जर त्यास २४ तासाच्या आत न्यायालयासमोर हजर केले नसेल तर हा अर्ज करता येऊ शकतो.
- ज्यावेळी एखाद्या व्यक्तीस बेकायदेशीरपणे डांबून ठेवले जाते तेव्हा तिला आपल्या अटकेच्या कारणांसंबंधी विचारणा करण्याचा अर्ज ती व्यक्ती स्वत: नातलगांमार्फत न्यायालयात (सर्वोच्च / उच्च) दाखल करु शकते.
- न्यायालय हा प्राधिलेख सार्वजनिक प्राधिकारी तसेच खाजगी व्यक्तींच्या विरुध्द काढू शकते. मात्र, न्यायालय हा प्राधिलेख पुढील बाबतीत काढू शकत नाही.



❑ **अपवाद :-**
- १) अटक कायदेशीर असल्यास,
- २) अटक कायदेमंडळ किंवा न्यायालयाच्या अवमानाशी संबधीत असेल तर,
- ३) सक्षम न्यायालयाने अटक केली असेल तर, आणि
- ४) अटक न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राच्या बाहेर असेल तर.

### २) परमादेश (Writ of Mandamus) :-

- अर्थ : कृती करा : मॅंडमस या लॅटिन भाषेतील शब्दाचा शब्दश: अर्थ 'आम्ही आज्ञा देतो' ('We command') असा होतो. मूलभूत हक्काचे उल्लंघन करणाऱ्याला काही कृती करण्यासाठी न्यायालयामार्फत हा आदेश दिला जातो. जर एखाद्या व्यक्तीचा मूलभूत हक्क, व्यक्ती किंवा सरकारी अधिकाऱ्याच्या निर्णयामुळे डावलला गेला तर ती व्यक्ती आपल्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी न्यायालयात परमादेश रिट अर्ज दाखल करु शकते.
- हा प्राधिलेख कोणत्याही सार्वजनिक संस्था, महामंडळ, कनिष्ठ न्यायालय, न्यायाधीकरण, सरकार यांच्याविरुध्द काढता येतो. मात्र हा प्राधिलेख पुढील बाबतीत काढता येत नाही.



❑ **अपवाद :-**
- १) खाजगी व्यक्ती किंवा संस्थेविरुध्द
- २) संबंधित अधिकाऱ्याचे कर्तव्य स्वेच्छधिन असल्यास,
- ३) राष्ट्रपती किंवा राज्यपालांच्या विरुध्द इत्यादी.

### ३) प्रतिषेध (Writ of Prohibition) :-

- अर्थ : प्रोहिबिशन या शब्दाचा शब्दश: अर्थ 'प्रतिबंध करणे' (tp forbid) जर कनिष्ठ न्यायालयाकडून अधिकार क्षेत्राचे उल्लंघन झाले तर त्याच्या अधिकारक्षेत्राबाहेर जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी हा अर्ज दाखल करता येतो.
- कनिष्ठ न्यायालयाने त्याच खटल्यातील आपला निर्णय बदलला / रद्द केला अथवा त्या न्यायाधीशाचे हितसंबंध संबंधित खटल्यात गुंतलेले आहेत अशी शंका आली तर वरिष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालयास खटला थांबविण्याचा निर्णय देते. यामुळे न्यायाधिशांना आपल्या अधिकारक्षेत्राचे उल्लंघन करता येत नाही.

### ४) उत्प्रेक्षण (Writ of Certiorati) :-

- अर्थ : या आदेशान्वये वरिष्ठ न्यायालये कनिष्ठ न्यायालयाला त्याच्याकडील प्रलंबित खटला वरिष्ठ न्यायालयात हस्तांतरित करण्यास सांगते.
- त्वरीत व निश्चित न्याय मिळण्यासाठी एखाद्या कनिष्ठ न्यायालयातील प्रकरण वरिष्ठ न्यायालयाकडे सुपूर्त करणे आवश्यक ठरते अशावेळी हा आदेश दिला जातो.
- कनिष्ठ न्यायालयाने अधिकारक्षेत्राचे उल्लंघन केल्यास, नैसर्गिक न्यायतत्त्वांची उपेक्षा केल्यास किंवा कायद्याची चूक केल्यास वरिष्ठ न्यायालय हा प्राधिलेख काढू शकते.
- उत्प्रेक्षण 'प्रतिबंधात्मक' तसेच 'उपचारात्मक' स्वरुपाचाही आहे.
- पूर्वी उत्प्रेक्षण प्राधिलेख केवळ न्यायिक व समन्यायिक प्राधिकाऱ्यांच्या विरुध्दच काढता येऊ शकतो. मात्र, (अपवाद :- तो कायदेमंडळ आणि खाजगी व्यक्तींच्या विरुध्द काढता येत नाही.)

### ५) अधिकारपृच्छा (Writ of Quo-warranto) :-

- अर्थ : या आदेशान्वये "सदर अधिकारपदावर राहण्याचा आपणास कोणता अधिकार आहे." अशी विचारणा न्यायालय करु शकते.
- एखादा प्रशासकीय अधिकारी त्याच्या कार्यक्षेत्राबाहेरील एखादी कृती करतो तेव्हा त्यास त्या कृतीपासून रोखण्यासाठी हा आदेश दिला जातो. सार्वजनिक / शासकीय पद पात्रता नसताना कोणी भूषवित असेल तर त्याविषयी पृच्छा (विचारणा) करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे.
- बेकायदेशीरपणे पद धारण करणाऱ्या व्यक्तीला ते पद सोडण्याची आज्ञा न्यायालय देते.
- हा प्राधिलेख घटनेने किंवा कायद्याने स्थापन केलेल्या कायमस्वरुपी स्वरुपाच्या सार्वजनिक कार्यालयाच्या बाबतीतच काढता येऊ शकतो. मात्र, मंत्रीपद किंवा खाजगी कार्यालयाच्या बाबतीत काढता येऊ शकत नाही.

❑ **जनहित याचिका : PIL (Public Interest Litigation)** – ही संकल्पना न्या. व्ही. आर. कृष्णाअय्यर यांनी विकसित केली.

❑ **आंबेडकरांनी वरील पाच अर्जांना मुलभूत अधिकारांचा आत्मा असे म्हटले आहे.**

## ➢ कलम ३३ (सशस्त्र दले आणि मूलभूत हक्क) :-

- सशस्त्र दले, निम लष्करी दले, पोलीस दले, गुप्तचर यंत्रणा आणि तद्नुषंगिक दलांच्या सदस्यांना प्राप्त असलेल्या मूलभूत हक्कांवर निर्बंध लादण्याचे किंवा त्यांना मर्यादित करण्याचा अधिकार कलम ३३ नुसार संसदेला दिलेला आहे. आपली कर्तव्ये व्यवस्थित पार पाडण्याची हमी आणि त्यांच्या मध्ये शिस्त राखण्याच्या हेतूने या तरतूदींचा समावेश केलेला आहे. कलम ३३ नुसार कायदे करण्याचा अधिकार राज्य विधिमंडळांना दिलेला नसून तो केवळ संसदेला दिलेला आहे. याबाबत संसदेने केलेला कोणताही कायदा मूलभूत हक्कांच्या विपर्यास्त आहे, या कारणाधारे त्यास कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येणार नाही.
- तद्नुषंगाने संसदेने आजतागायत लष्कर कायदा (१९५०), नौदल कायदा (१९५०), हवाई दल कायदा (१९५०), पोलीस दले (हक्कांवरील निर्बंध) कायदा (१९६६), सीमा सुरक्षा दल कायदा आणि इतर कायदे निर्माण केले आहेत. या कायद्यांमुळे त्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटना स्थापना करणे, कामगार संघटना या राजकीय संघटनांचे सदस्य असणे, वृत्तपत्रांशी संपर्का साधणे, सार्वजनिक सभा किंवा निदर्शनांना उपस्थित राहणे इ. प्रकारच्या मूलभूत हक्कांवर निर्बंध घातलेले आहेत. 'सशस्त्र दलांचे सदस्य' या संज्ञेमध्ये योध्दा नसणारे लष्करी कर्मचारी उदा. न्हावी, सुतार, यंत्रज्ञ कामगार, स्वयंपाकी, चौकीदार, चांभार, शिंपी वगैरे सदस्यांचा देखील समावेश होतो.
- मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसंदर्भात सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांच्या आदेशांपासून कोर्ट मार्शलला देखील कलम ३३ नुसार संसदीय कायद्यांतर्गत वगळले जाऊ शकते.

## ➢ कलम ३४ (मार्शल – लॉ आणि मूलभूत हक्क) :-

- भारतातील कोणत्याही भूप्रदेशात मार्शल – लॉ कार्यवाहीत असेल तर कलम ३४ नुसार त्या भुप्रदेशातील नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर निर्बंध येतात. मार्शल – लॉ लागू असलेल्या ठिकाणी कायदा – सुव्यवस्था पुनर्स्थापित करण्यासाठी वा तो सांभाळण्यासाठी केलेल्या कृतीबाबत कोणतीही व्यक्ती किंवा सरकारी कर्मचारी यांचा बचाव करण्याचा अधिकार संसदेला आहे. संबंधित प्रदेशामध्ये मार्शल – लॉ अंतर्गत एखादे संमत केलेले विधान, लादलेली शिक्षा, दंडित आदेश किंवा इतर कोणतीही कृती संसद कायदेशीर, बंधनकारक करु शकते. संसदेने बचावसंदर्भात केलेल्या कोणत्याही कायद्याला (Act of Indemnity) तो कोणत्याही मूलभूत हक्काच्या विसंगत आहे, याकारणास्तव कोणत्याही न्यायालयामध्ये आव्हान देता येत नाही.

❑ **ब्रिटिश कॉमन** – लॉ वरुन भारताने मार्शल – लॉची संकल्पना स्वीकारलेली आहे. तथापि, राज्यघटनेमध्ये कोठेही मार्शल – लॉ ची व्याख्या निश्चित केलेली नाही. शब्दश: याचा अर्थ 'लष्करी राजवट' असा होतो. मार्शल – लॉ म्हणजे अशी परिस्थिती असते, तिथे सामान्य कायद्याच्या चौकटीबाहेर असणाऱ्या आपल्या नियमांद्वारे लष्करी अधिसत्ता नागरी प्रशासन चालविते. लष्करी न्यायासनांद्वारे सामान्य कायदे आणि तहकूब केले जाते.

❑ **मार्शल** – लॉ घोषित करण्याच्या कार्यकारी मंडळाच्या अधिसत्तेबाबत राज्यघटनेमध्ये उल्लेख वा विशेष तरतूद आढळत नाही. तथापि, कलम ३४ अंतर्गत ही बाब स्पष्ट होते की, भारतीय भूक्षेत्रात कोठेही मार्शल – लॉ घोषित केला जाऊ शकतो. युध्द, आक्रमण, घुसखोरी, बंडाळी, दंगल किंवा कायद्याला केलेला कोणताही हिंसक प्रतिकार इ. असामान्य परिस्थितीमध्ये मार्शल – लॉ लादला जातो. बळाद्वारे दुसऱ्या बळाचा बीमोड करुन समाजात सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी मार्शल – लॉचे समर्थन केले जाते.

❑ **मार्शल** – लॉची अंमलबजावणी सुरु असताना सर्व अत्यावश्यक पावले उचलण्यासाठी लष्करी अधिकाऱ्यांना असामान्य अधिकार दिले जातात. नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर निर्बंध वा नियमन लादणे, नागरिकांना शिक्षा देणे किंवा त्यांची हत्या करण्याचा अधिकारदेखील त्यांना प्राप्त होतो. सर्वोच्च न्यायालयाने घोषित केले की, मार्शल – लॉ च्या परिणाम स्वरुप 'बंदी प्रत्यक्षीकरण' या आदेशाची तहकुबी होत नाही. कलम ३५२ नुसार घोषित केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय आणीबाणीपासून कलम ३४ नुसार घोषित केला जाणारा मार्शल – लॉ हा भिन्न आहे.

## ❖ राष्ट्रीय आणीबाणी आणि मार्शल – लॉ या दोहोंमधील फरक पुढीलप्रमाणे :-

१) मार्शल – लॉ चा परिणाम परिणाम केवळ मूलभूत हक्कांवर होतो. राष्ट्रीय आणीबाणीचा परिणाम केवळ मूलभूत हक्कांवरच होत नाही तर, त्यामूळे केंद्र – राज्य संबंध, केंद्र आणि राज्यातील महसूल आणि विधीविषयक अधिकारांचे वाटप आणि संसदेची कालमर्यादा यावरही होतो.

२) मार्शल – लॉ मुळे शासन आणि सामान्य कायदा न्यायालये तहकूब होतात. राष्ट्रीय आणीबाणीमध्ये शासन आणि सामान्य कायदा न्यायालये कार्यरत असतात.

३) कोणत्याही कारणामुळे मोडकळीस आलेली कायदा आणि सुव्यवस्था पुनर्स्थापित करण्यासाठी मार्शल – लॉ घोषित केला जातो. राष्ट्रीय आणीबाणी युध्द, परकीय आक्रमण किंवा सशस्त्र बंडाळी केवळ या तीन कारणांच्या आधारेच घोषित करता येते.

४) मार्शल – लॉ देशाच्या एखाद्या विशिष्ट क्षेत्रातच लावला जाऊ शकतो. राष्ट्रीय आणीबाणी संपूर्ण देशासाठी किंवा तिच्या कोणत्याही एका भागासाठी लावली जाते.

५) मार्शल – लॉ बाबत राज्यघटनेमध्ये कोणतीही विशिष्ट तरतूद नसून ही बाब सूचित आहे. या उलट, राष्ट्रीय आणीबाणीबाबत विशिष्ट आणि सविस्तर तरतूदी राज्यघटनेमध्ये नमूद केलेल्या आहेत.

## ➢ कलम ३५ (ठराविक मूलभूत हक्कांची परिणामकारकता) :-

- काही विशिष्ट मूलभूत हक्कांना परिणामकारकता देण्यासाठी कायदा करण्याचा अधिकार राज्य विधीमंडळांना दिलेला नसून केवळ संसदेला दिलेला आहे. या तरतूदीमुळे संबंधित मूलभूत हक्कांच्या स्वरुपाबाबत आणि तिच्या उल्लंघनाबाबतची शिक्षा यामध्ये संबंध देशात एकवाक्यता निर्माण होण्याची हमी मिळते. या संदर्भात, कलम ३५ मध्ये पुढील तरतूदी आहेत –

१) पुढील विषयांबाबत संसदेला (राज्यविधिमंडळांना नव्हे) कायदे करण्याचा अधिकार आहे :

- एखादे घटकराज्य वा केंद्रशासित प्रदेश वा स्थानिक शासन वा इतर अधिसत्तेतील विशिष्ट रोजगार किंवा नियुक्त्यांसाठी 'रहिवास' ही अट नमूद करणे (कलम १६).
- मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी निर्देश, आदेश आणि सर्व प्रकारचे अर्ज (रिट्स) जारी करण्याबाबत
- सशस्त्र दल, पोलीस दल वगैरे दलांच्या सदस्यांचे मूलभूत हक्क निर्बंधित वा संक्षेपित करणे. (कलम ३३).
- संबंधित क्षेत्रात मार्शल – लॉ च्या कार्यवाहीदरम्यान केलेल्या कोणत्याही कृतीबाबत कोणतीही व्यक्ती वा सरकारी कर्मचाऱ्याचा बचाव करणे (कलम ३४).

२) मूलभूत हक्कांतर्गत गुन्हा म्हणून घोषित केलेल्या कृतींबाबत शिक्षा नमूद करण्यासाठी कायदा करण्याचा अधिकार संसदेला (राज्यविधिमंडळाला नव्हे) असेल. यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

- अ) अस्पृश्यता ब) मानवी व्यापार आणि सक्तीचे श्रम.
- वर उल्लेखलेल्या कृतींबाबत शिक्षा नमूद करण्यासाठी, राज्यघटनेच्या अंमलबजावणीनंतर, संसद कायदा करु शकते.

३) राज्यघटनेच्या अंमलबजावणेवेळी (२६ जानेवारी १९५०) वर नमूद केलेल्या कोणत्याही विशिष्ट विषयासंदर्भात एखादा कायदा कार्यवाहीत असेल तर संसदेने त्यामध्ये बदल, दुरुस्ती करेपर्यंत वा तो माघारी घेईपर्यंत त्यात सातत्य राहील.

- वर नमूद केलेल्या विषयांपैकी काही विषय राज्य विधिमंडळाच्या (म्हणजेच राज्यसूची) परिघात येत असले तरी त्याबाबत कायदा करण्याचा अधिकार कलम ३५ नुसार संसदेला देण्यात आला आहे, याची नोंद घ्यावी लागते.

# संपत्तीचा अधिकार

- संविधानकारांनी संपत्तीचा हक्क हा मूलभूत हक्काच्या यादीम कलम १९ (१) (फ) द्वारे नमूद केला होता. त्याचप्रमाणे कलम ३१ नुसार संपत्तीच्या अधिकाराविषयीच्या कायदेविषयक तरतूदीही नमूद केल्या गेल्या.
- संपत्तीच्या मूलभूत हक्कावरुन न्यायपालिका व संसद यांच्यात अनेकवेळा संघर्ष घडून आला. जनता पक्षाने १९७८ – ७९ मध्ये ४४ व्या दुरुस्तीन्वये संपत्तीचा हक्क संविधानाच्या तिसऱ्या भागातून वगळला.
- कलम १९ (१) (फ) आणि कलम ३१ रद्दबातल ठरवले आणि संविधानाच्या १२ व्या भागात नवा ३०० (अ) हा अनुच्छेद 'वित्त, मालमत्ता आणि सूट्स' या शीर्षकाखाली अंतर्भूत करुन त्यात एक कायदेशीर हक्क म्हणून समाविष्ट केला.
- 'कायदेशीर अधिकाराखेरीज कोणत्याही व्यक्तीपासून तिची संपत्ती हिरावून घेतली जाणार नाही.' म्हणजे कायदेशीर तरतूद करुनच मालमत्ता ताब्यात घेतली जाऊ शकते अशी तरतूद केली.

## ❖ मुलभूत हक्क व सर्वोच्च न्यायालय :-

- भारतीय घटनेने मूलभूत हक्कांच्या तरतुदींबरोबरच या हक्कांची हमी देण्यासाठी कलम ३२ अन्वये घटनात्मक उपायांचा अधिकारही बहाल केला आहे. महत्त्वाचे म्हणजे मूलभूत हक्काच्या प्रकरणाच्या प्रारंभीच कलम १३ मध्ये मूलभूत हक्क हिरावून घेणारा कायदा राज्यास करता येणार नाही अशी तरतूद करुन न्यायिक पुनरावलोकनाचे तत्त्व अंतर्भुत केले आहे. या दोन्ही तरतुदींच्या माध्यमातून भारतीय घटनेने सर्वोच्च न्यायालयास मूलभूत हक्कांचा संरक्षणकर्ता ही भूमिका सोपवली आहे हे लक्षात येते. सर्वोच्च न्यायालयाने ही भूमिका पुढीलप्रमाणे पार पाडल्याचे दिसून येते.

१) कलम १३(२) नुसार मूलभूत हक्क काढून घेणारा अथवा त्यात ढवळाढवळ करणारा कायदा सर्वोच्च न्यायालय रद्दबातल ठरवू शकते.

२) कलम ३२ नुसार मूलभूत हक्कांचे संरक्षण न्यायालयाद्वारे होईल. आपल्या हक्क रक्षणासाठी कोणतीही व्यक्ती सर्वोच्च न्यायालय अथवा उच्च न्यायालयाकडे (अनुक्रमे कलम ३२,२२६) दाद मागू शकते. ५ वेगवेगळ्या अर्जाद्वारे दाद मागता येते. यानुसार न्यायालय अंमलबजावणी अधिकाऱ्यास आदेश, निर्देश देऊ शकते.

३) व्यक्तीचा आपल्या हक्कांच्या रक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार काढून घेता येत नाही. (अपवाद घटनेने नमूद केलेली परिस्थिती)

४) अशा प्रकारे सर्वोच्च न्यायालय हे मूलभूत हक्कांचे संरक्षक आहे व ती भूमिका बजावताना १९५० पासून सर्वोच्च न्यायालयाने वेगवेगळ्या वेळी त्यांचे महत्त्व नमूद केले आहे.

| खटला | वर्ष | निकाल |
|---|---|---|
| गोपालन खटला | १९५० | मूलभूत हक्क महत्त्वाचे मानले. |
| गोलखनाथ | १९६७ | मूलभूत हक्क पवित्र आहेत व त्यात दुरुस्ती शक्य नाही असा निर्णय दिला. |
| केशवानंद भारती | १९७३ | मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वात संतुलन सांगितले. कलम ३९(ब) व (क) ची अंमलबजावणी करायची असेल तरच दुरुस्ती शक्य आहे असे नमूद केले. याच खटल्यात 'मूलभूत चौकट' ही संकल्पना समाविष्ट केली आणि या चौकटीस बाधा आणणारा कायदा वा घटनादुरुस्ती करता येणार नाही हे स्पष्ट केले. |
| मनेका गांधी खटला | १९७८ | कलम २१ बाबतीत व्यक्तीच्या 'जीविताच्या हक्का'ची संकल्पना व्यापक बनवली आणि या संदर्भात न्यायिक पुनर्विलोकनाचा हक्क प्रस्थापित केला. |
| मिनर्वा मिल्स खटला | १९८० | मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वांत संतुलन सांगितले. |

- जनहित याचिका (पीआयएल) चा विकास करुन व्यक्तीच्या हक्कांची हमी दिली.
- न्यायिक सक्रियतेद्वारे अनेक दुर्बल, वंचित समूहांच्या तसेच पर्यावरणीय हक्कांचे संरक्षण केले.
- कायदेमंडळांच्या विशेषाधिकारापेक्षा पुष्कळ वेळा सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत हक्कांना महत्त्व दिले आहे. यासंबंधी संसदेवरील प्रकरणात सविस्तर चर्चा केली आहे.
- २००७ मध्ये ९ व्या परिशिष्टासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय, ज्यानुसार घटनेच्या मौलिक संरचनेशी व मौलिक संरचनेतील मूलभूत हक्कांशी विसंगत कायदा अयोग्य घोषित होईल असे सांगितले.

# मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे यावरील महत्त्वपूर्ण खटले

- १९५० ते १९६६ – सर्वोच्च न्यायालयाने संसदेचा घटनादुरुस्तीचा अधिकार मान्य केला तरी मार्गदर्शक तत्त्वाच्या तुलनेत मूलभूत हक्कास, विशेषत: मालमत्तेच्या हक्कास अग्रक्रम दिला.
- संसदेने बिहार, मध्यप्रदेश आणि उत्तर प्रदेश या राज्याने केलेल्या जमीन सुधारणा कायद्यांना संरक्षण देण्यासाठी पहिली घटनादुरुस्ती केली (१९५१). यानुसार ३१ अ आणि ३१ ब ही दोन नवीन कलमे समाविष्ट करण्यात आली.
- ३१ अ नुसार राज्याने एखाद्या व्यक्तीची मालमत्ता ताब्यात घेतल्यास, विभाग ३ मधील कोणत्याही हक्काचा संकोच होतो असे मानून न्यायालयात जाण्यास प्रतिबंध केला.
- ३१ ब नुसार १३ विविध कायदे आणि नियम एका नवीन परिशिष्ठात म्हणजेच ९ व्या परिशिष्टात समाविष्ट करण्यात आले.

## ❖ शंकरीप्रसाद विरुध्द भारतीय संघराज्य (१९५१) :-

- या खटल्यात पहिल्या दुरुस्तीला आवाहन देण्यात आले. त्याचबरोबर श्रीमती चंपकप दोराईराजन विरुध्द मद्रास राजन (१९५१), गोहत्या खटला, केरळ शिक्षण विधेयक (१९५८) इ. खटल्यामध्ये संसदेच्या दुरुस्तीच्या अधिकारांवर प्रश्नचिन्हे लावले गेले. परंतू या खटल्यामध्ये संसदेला मूलभूत हक्कामध्ये कलम ३६८ नुसार दुरुस्ती करता येते असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. हा निकाल देतांना न्यायालयाने स्पष्ट केले कलम १३(२) मध्ये ‘कायद्या’च्या व्याखेत केवळ संसदीय कायदा समाविष्ट होतो. घटनादुरुस्ती अंतर्भूत होत नाही. म्हणजेच संसद मूलभूत अधिकारात घटनादुरुस्तीद्वारा बदल करु शकते. असा निवाडा दिला.
- १९५४ च्या बेला बँनर्जी खटल्यात संसदेच्या दुरुस्ती अधिकाराऐवजी एखाद्या व्यक्तीची मालमत्ता हाती घेतल्यास त्याबद्दल दिल्या जाणाऱ्या नुकसानभरपाईचा प्रश्न उपस्थित केला. सर्वोच्च न्यायालयाने बेला बॅनर्जी यांचा युक्तीवाद मान्य करुन कलम ३१ (२) चा आधार घेवून न्याय नुकसान भरपाई द्यावी असा निर्णय दिला. बेला बॅनर्जी यांच्या खटल्याने निर्माण केलेली अडचण दुर करण्यासाठी संसदेने ४ थी घटनादुरुस्ती (१९५५) स्वीकारली. या दुरुस्तीनुसार शासनाद्वारे दिली जाणारी नुकसान भरपाई निर्धारित करण्याचा अधिकार केवळ संसदेला, कायदेमंडळाला आहे. यामुळे नुकसानभरपाईचा प्रश्न न्यायालयाच्या कार्यक्षेत्राबाहेरचा आहे अशी तरतूद केली.

## ❖ सज्जनसिंग विरुध्द राजस्थान (१९६५) :-

- या खटल्यात १७ व्या घटनादुरुस्तीला आवाहन देण्यात आले. संबंधित घटनादुरुस्तीस कलम ३६८ च्या तरतूदीनुसार अर्ध्याअधिक घटकराज्यांनी मान्यता दिली नाही. ही दुरुस्ती उच्च न्यायालयाच्या कलम २२६ अंतर्गत येणाऱ्या न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार मर्यादित करते. तथापि सर्वोच्च न्यायालयाने अधिकार मान्य करणाराच निकाल दिला.
- पहिल्या टप्प्यात संसदेद्वारे हाती घेतलेल्या दुरुस्त्या ‘मालमत्तेच्या अधिकाराचा संकाचे करतात’ म्हणून आव्हानित केल्या गेल्या. न्यायालयाने संसदेचा दुरुस्तीचा अधिकार जरी मान्य केला असला तरीही मालमत्तेच्या हक्काची (मूलभूत हक्क) ची बाजू अचलून धरली.

## ❖ गोलकनाथ विरुध्द पंजाब राज्य (१९६७) :-

- या खटल्यात १ ली, ४ थी आणि १७ वी दुरुस्त्या ‘मूलभूत हक्काचा संकोच करतात’ असा युक्तिवाद करुन त्यांस आव्हान दिले गेले. अकरा न्यायाधीशांच्या विशेष पीठाने हा खटला चालवला. यात सर्वोच्च न्यायालयाने अभूतपूर्व निर्णय दिला त्यानुसार संसदेला मूलभूत हक्कांच्या प्रकरणात दुरुस्ती करण्याचा अधिकार नाही असे प्रतिपादन करुन तो अधिकारच काढून घेतला. यासाठी न्यायालयाने पुढील दोन युक्तिवाद गृहीत धरले.

१) १३ (२) नुसार ‘राज्याला मूलभूत अधिकाराचा संकोच करणारा अथवा अधिकार काढून घेणारा कायदा करता येणार नाही’ अशी तरतूद होती. सर्वोच्च न्यायालयाने या तरतुदीचा आधार घेऊन संसदेमार्फत केली गेलेली घटनादुरुस्ती हा देखील कायदा आहे आणि तो कलम १३(२) मधील कायद्याच्या व्याख्येत येतो असे स्पष्ट करुन संसदेचा घटनादुरुस्तीचा अधिकार नाकारला.

२) संविधानामधील ३६८ हे कलम संसदेस दुरुस्तीचा घटनात्मक अधिकार देत नाही तर केवळ घटनादुरुस्ती प्रक्रिया वा पध्दती नमूद करते असे मत मांडले आणि संसदेचा दुरुस्तीचा अधिकार नाकारला.

- सर्वोच्च न्यायालयाने गोलकनाथ खटल्यानंतर वज्रवेलू, धातू महामंडळ (१९६९) आणि बँक राष्ट्रीयीकरण खटला (१९७०) या खटल्यांमध्ये वरील भूमिकेचीच ‘री’ ओढली. त्यात नुकसान भरपाई ही न्याय्य नुकसान भरपाई असावी अशी भूमिका पुन्हा एकदा मांडली. परिणामी पुढे संसदेने विविध दुरुस्त्या हाती घेतल्या आणि गोलकनाथ निर्णयावर मात करण्याचा प्रयत्न केला.

१९७२ – १९७५ : काही मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी मूलभूत हक्कांमध्ये परिवर्तन करता येते. म्हणजे दोन्ही तरतूदी महत्त्वाच्या व परस्परपूरक आहेत.

गोलकनाथ खटल्याने संसदेचा दुरुस्तीचा अधिकार हिरावून घेतल्याने, हा अधिकार पुन्हा मिळवण्यासाठी संसदेने २४ वी व २५ वी (१९७१) अशा दोन दुरुस्त्या केल्या. २४ व्या दुरुस्तीनुसार अशी तरतूद केली की, ३६८ कलमान्वये संसदेला मूलभूत अधिकारांसह घटनेतील कोणत्याही भागाची दुरुस्ती करता येते. संसदेने अशा रीतीने दुरुस्तीचा पुन:प्रस्थापित केला. २५ व्या घटना दुरुस्तीने पुढील ३ महत्त्वाचे बदल केले.

१) कलम ३१ (२) मधील नुकसान भरपाई (Compensation) हा शब्द काढून, तेथे रक्कम (Amount) हा शब्द समाविष्ट केला.
२) राज्याने सार्वजनिक हेतूसाठी एखादी मालमत्ता ताब्यात घेतली अथवा आपल्या नियंत्रणाखाली आणली तर त्यास १९(१) (फ) हे कलम लागू केले जाऊ नये. म्हणजेच शासनाला मालमत्ता ताब्यात घेण्याचा अधिकार दिला.
३) ३१(क) हे नवे कलम समाविष्ट करण्यात आले. त्यानुसार मार्गदर्शक तत्त्वांतील कलम ३९ (ब) आणि (क) या तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी संसदेने कायदा केल्यास तो कायदा कलम १४, कलम १९ अथवा कलम ३१ चे उल्लंघन करतो असे मानू नये.

## ❖ केशवानंद भारती विरुध्द केरळ राज्य (१९७३) :-

- या खटल्यात २४, २५ व २९ या दुरुस्त्यांना आव्हान देण्यात आले. या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने गोलकनाथ खटल्यातील निर्णय फिरवला आणि या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने गोलकनाथ खटल्यातील निर्णय फिरवला आणि आपली पूर्वीची भूमिका बदलली. या निर्णयात २४ व २५ व्या दुरुस्तीस न्यायालयाने मान्यता दिली असली तरीही एक महत्त्वाचा विचार मांडला. २९ व्या दुरुस्तीअन्वये केरळ राज्याचे जमीन सुधारणा कायदे ९ व्या परिशिष्टात समाविष्ट करुन त्यास पुनर्विलोकनाच्या अधिकारापासून संरक्षित केले होते. न्यायालयाने याबाबत स्पष्ट केले की 'घटनापीठा' मार्फत ९ व्या परिशिष्टात समाविष्ट केलेल्या बाबींचे पुनर्विलोकन होऊ शकते.

## ❖ इंदिरा गांधी विरुध्द राज नारायण (१९७५) :-

- दर्जा व संधीची समानता
- कायद्याचे अधिराज्य
- या खटल्यात ३९ व्या घटना दुरुस्तीन्वये ३२९ कलमात केलेली दुरुस्ती घटनाबाह्य असल्याचे व ती मूलभूत संरचनेचा भंग करत असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. (त्यानंतर २६ जून ते मार्च १९७७ पर्यंत भारतात आणीबाणी होती.)

## ❖ मिनर्वा मिल्स लि. विरुध्द भारतीय संघ (१९८०) :-

- या खटल्यात पुन्हा एकदा न्या. वाय. व्ही. चंद्रचूड यांनी काही तत्त्वे उद्‌धृत केली.
- संसदेचा दुरूस्तीचा अधिकार
- न्यायिक पुनर्विलोकन
- मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे यांतील संतुलन
- या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मूलभूत हक्कांस राज्याच्या मार्गदर्शक तत्वांपेक्षा श्रेष्ठ दर्जा दिला. खटल्याचा निकाल देताना न्यायमूर्तींनी 'मूळ ढाच्याची आवश्यक वैशिष्टये' असा शब्दप्रयोग केला. कलम ३६४ (४), कलम ३६८ (५) या दोन्ही कलमातील तरतुदी रद्द केल्या.

## ❖ सेंट्रल कोल फिल्ड्स लि. विरुध्द जयस्वाल कोल कं. (१९८०) :-

- न्यायाप्रती प्रभावी पोहोच

## ❖ वामन राव विरुध्द भारतीय संघ (१९८१) :-

- या खटल्यामध्येही मौलिक संरचना सिध्दांताचा पुनर्उच्चार करण्यात आला. १९८१ मध्ये वामनराव प्रकरणात नवव्या परिशिष्टाबद्दल सर्वोच्च न्यायालयाने पुढील भाष्य केले - "मूलभूत हक्कांवर गदा आणणारा कायदा नवव्या परिशिष्टात टाकण्या बाबतची दुरुस्ती नवव्या परिशिष्टात टाकली जात नाही तोपर्यंत तो अवैध ठरेल."

## ❖ मनेका गांधी खटला :- कलम २१ मधील तरतुदींचा अर्थ व्यापक करण्यात आला.

## ❖ एस. पी. संपतकुमार विरुध्द भारतीय संघ (१९८७) आणि पी. संबमूर्ती विरुध्द आंध्रप्रदेश राज्य (१९८७) :-

- या दोन्ही खटल्यांमध्ये न्यायमूर्तींनी पुढील तत्त्वांचा उल्लेख केला.
- कायद्याचे अधिराज्य
- न्यायिक पुनर्विलोकन

## ❖ इंदिरा साहनी विरुध्द भारत सरकार खटला (१९९२) :-

- तामिळनाडू राज्यात १९९२ मध्ये ६९% जागा राखीव ठेवण्यात आल्या. (अनुसूचित जाती १८%, अनुसूचित जमाती १% व इतर मागासवर्गीय ५०%). त्या संदर्भातील या खटल्याचा निकाल देताना १६ नोव्हेंबर १९९२ रोजी "कोणत्याही परिस्थितीत राखीव जागांचे प्रमाण कलम १६(४) अन्वये ५०% पेक्षा अधिकन नसावे" असा सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला.
- कलम १६(४) अन्वये ठेवण्यात आलेल्या जागांचे आरक्षण फक्त नोकरीत प्रवेश करण्यापुरते मर्यादित राहील. त्यानंतरच्या बढतीसाठी आरक्षणाचे तत्त्व स्वीकारता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे सरकारी / निमसरकारी नोकऱ्यांतील राखीव जांगाच्या धोरणावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता होती.
- राखीव जागांची भरती योग्य त्या प्रमाणात न झाल्यामुळे हे धोरण चालू ठेवणे आवश्यक होते. म्हणून यापुढेही नोकरीत प्रवेश करताना व बढती देताना आरक्षण ठेवण्याचे धोरण तसेच चालू राहील असे ठरले.
- त्यासाठी घटनेत १६ (४अ) या नव्या कलमाचा समावेश केला. तसेच तामिळनाडू सरकारने या निकालाविरुध्द मागासवर्गीयांना आरक्षण देणारे विधेयक १९९३ मध्ये पास केले व भारत सरकारच्या संमतीसाठी पाठविले.
- घटनेच्या ३१-B कलमानुसार भारत सरकारने त्या बिलाला मान्यता दिली आणि त्यावर अध्यक्षांच्या संमतीचे शिक्कामोर्तब करण्यात आले.
- या निर्णयाला घटनेची मान्यता प्राप्त व्हावी याकरिता तामिळनाडू Act ४५ of १९९४ या कायद्याचा नवव्या परिशिष्टात समावेश केल्यामुळे कलम ३१B नुसार न्यायालयीन पुनर्विलोकनापासून संरक्षण मिळाले.

## ❖ किहोतो होलोहोन (१९९३) खटला :-

- लोकशाही
- नियमितपणे पार पडणाऱ्या निवडणुका

## ❖ एस. आर. बोम्मई विरुध्द भारतीय संघ (१९९४) :-

- या खटल्यात न्यायमूर्ती सावंत आणि न्या. कुलदीप सिंह यांनी पुढील तत्त्वे मौलिक संरचनेमध्ये समाविष्ट केली.
- लोकशाही
- संघराज्य
- धर्मनिरपेक्षता
- ३५६ चा गैरवापर करु नये.

## ❖ बाल मुकुंद साह विरुध्द बिहार राज्य (२०००) :-

- कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ आणि न्यायमंडळ यांच्यामध्ये सत्ताविभाजन
- न्यायालयाचे स्वातंत्र्य
- याशिवाय, भारतीय घटनेचे अभ्यासक नानी पालखीवाला यांनी पुढील बाबी समाविष्ट केल्या.
- भारताचे अखंडत्व (Integrity)
- लोकशाही जीवनप्रणाली
- स्वतंत्र व स्वायत्त न्यायमंडळ
- संघराज्याची चौकट
- कायदेमंडळ, कार्यकारी व न्यायमंडळ यांतील संतुलने
- अशाप्रकारे मौलिक संरचनेचा सिध्दांत हा व्यक्तिनिष्ठ स्वरुपाचा असल्याने त्यावर टीका होते. शिवाय, या सिध्दांतातील मोठी उणीव म्हणजे, कोणती बाब मौलिक आहे किंवा नाही याबाबत असणारी संदिग्धतता होय.

## ❖ आय.आर. कोएल्हो वि. तामिळनाडू राज्य खटला (२००७) :-

- सर्वोच्च न्यायालयाने घटनेच्या नवव्या परिशिष्टातील कायद्यांच्या पुनर्विलोकनाचा अधिकार स्वत:कडे घेतला. न्यायालयीन छाननी टाळण्यासाठी २४ एप्रिल १९७३ नंतर नवव्या परिशिष्टाद्वारे संरक्षण देण्यात आलेल्या कायद्यांचीही समीक्षा होऊ शकत असल्याचा ऐतिहासिक आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या ९ सदस्यीय घटनापीठाने दिला.
- जानेवारी २००७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या या निकालानुसार नवव्या परिशिष्टातील कायद्यांना या न्यायालयीन पुनर्विलोकनापासून असलेले संरक्षण रद्द झाले आहे. २४ एप्रिल १९७३ नंतर नवव्या परिशिष्टात समाविष्ट करण्यात आलेले कायदे :- १) जर मूलभूत हक्कांचा भंग करत असतील किंवा २) त्यांच्याद्वारे राज्यघटनेच्या मूलभूत ढाच्याला बाधा पोहोचत असेल तर ते न्यायालयाच्या पुनर्विलोकनाच्या कक्षेत येणार आहेत. या निकालाने पुढील मुद्यांवर भर दिला –
    १. राज्यघटनेच्या मूळ ढाच्याला धोका पोहोचविणारा नवव्या परिशिष्टातील कायदा.
    २. घटनेच्या भाग ३ मध्ये नमूद केलेला मूलभूत हक्कांना बाधा आणणारा कायदा.
    ३. नवव्या परिशिष्टातील एखादा कायद्याला सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिली असेल तर तो कायदा घटनेच्या ३१B कलमातील तरतुदीनुसार केंद्र सरकारने जे पहिले १३ कायदे नवव्या परिशिष्टात सामील ते सर्व जमीन सुधारणांसंबंधी होते, पण त्यानंतर नवव्या परिशिष्टातील कायद्याची संख्या २८४ पर्यंत वाढविताना नंतरच्या सरकारनी ३१B कलमाचा स्वत:च्या सोयीनुसार वापर केला.
- २५ एप्रिल १९७३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने २९ व्या घटनादुरुस्तीचे पुनर्विलोकन करताना (केशवानंद भारती श्रीपादगलवरुन विरुध्द केरळ सरकार या खटल्याचा निकाल देताना), भारतीय राज्यघटनेच्या मूळ ढाच्याबद्दलची संकल्पना पहिल्यांदा व्यक्त केली होती. त्यापूर्वी ३१B कलमानुसार मूलभूत हक्कावर बंधने किंवा निर्बंध आणणारे कायदे नवव्या परिशिष्टात समाविष्ट केल्यास त्यांना न्यायालयीन पुनर्विलोकनापासून संरक्षण मिळाले होते.
- मंडल आयोगाच्या शिफारशींच्या खटल्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने कमाल आरक्षणावर ५० टक्के मर्यादा घालणारा निकाल दिला होता. पण तामिळनाडू सरकारने हे आरक्षण ६९ टक्क्यांपर्यंत वाढवून केंद्र सरकारला १९९४ साली सदर कायदा नवव्या परिशिष्टात समाविष्ट करण्यास भाग पाडले होते.

## ➢ परकीय व्यक्तींचे (Foreigners) मूलभूत हक्क :-

- भारतीय नागरिकांप्रमाणेच परकीय व्यक्तींना (शत्रू परकीय व्यक्ती सोडून) पुढील मूलभूत हक्क उपलब्ध आहेत.

| | |
|---|---|
| १) कलम १४ - | कायद्यासमोर समानता |
| २) कलम २० - | गुन्ह्यांपासून संरक्षण |
| ३) कलम २१ - | जीवित आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण |
| ४) कलम २१ (अ) – | प्राथमिक शिक्षणाचा हक्क |
| ५)कलम २२ - | ठराविक प्रकरणांमध्ये अटक आणि प्रतिबंधक स्थानबध्दतेविरुध्द संरक्षण |
| ६)कलम २३ – | मानवी व्यापार |
| ७)कलम २४ – | लहान मुलांना धोकादायक ठिकाणी काम |
| ८) कलम २५ – | धार्मिक स्वातंत्र्य |
| ९) कलम २६ – | धार्मिक व्यवहारांचे व्यवस्थापन करण्याचे स्वातंत्र्य |
| १०) कलम २७ - | कोणत्याही धर्माच्या प्रसारासाठी कर देण्याचे स्वातंत्र्य |
| ११) कलम २८ – | शैक्षणिक संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण |

- पुढील मुलभूत हक्क हे केवळ भारतीय नागरिकांनाच उपलब्ध असून कोणत्याही परकीय व्यक्तीला उपलब्ध नाहीत.

१) कलम १५ – धर्म, वंश, जात, लिंग वा जन्मस्थळ या आधारावर भेदभाव करण्यास प्रतिबंध
२) कलम १६ – सार्वजनिक सेवांमध्ये समान संधी
३) कलम १९ (१) – स्वातंत्र्याशी संबंधित ६ हक्कांना संरक्षण
४) कलम २९ - अल्पसंख्याकांच्या भाषा, लिपी आणि संस्कृतीचे संरक्षण
५) कलम ३० – शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि त्यांचे प्रशासन चालविण्याचा अल्पसंख्यांकाचा हक्क

# मार्गदर्शक तत्त्वे

## ❖ राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे (भाग ४ था, कलम ३६ ते ५१) :-

| | भाग चौथा : राज्यधोरणाची निर्देशक तत्त्वे | |
|---|---|---|
| ३६ | व्याख्या | |
| ३७ | या भागातील असलेली तत्त्वे लागु करणे. | |
| ३८ | राज्याने लोककल्याण संवर्धनपर समाजव्यवस्था प्रस्थापित करणे. | (समाजवादी तत्त्व) |
| ३९ | राज्याने अनुसरावयाच्या धोरणाची तत्त्वे<br>३९ (a) - स्त्री - पुरुषांना उपजिवीकेचे पुरेसे साधन<br>३९ (b) - भौतिक मालमत्तेची समान विभागणी<br>३९ (c) - संपत्ती आणि उत्पादनाचे केंद्रीकरण होऊ न देणे.<br>३९ (d) - स्त्री - पुरुषांना समान काम समान वेतन<br>३९ (e) - स्त्री, पुरुष कामगारांचे आरोग्य व बालकांचे कोवळे वय यांचा गैरफायदा घेऊ नये.<br>३९ (f) - बालकांना निरामयपद्धतीने मुक्त व प्रतिष्ठा पूर्ण वातावरणात संधी व सुविधा दिल्या जाव्यात. | (समाजवादी तत्त्व) |
| ३९ अ | समान न्याय व विधीविषयक मोफत सल्ला (free ligel aid) | (समाजवादी तत्त्व) |
| ४० | ग्रामपंचायतीची सुसूत्र व्यवस्था लावणे. | (गांधीवादी तत्त्व) |
| ४१ | कामाचा, शिक्षणाचा व विविक्षित बाबतीत सरकारी मदतीचा अधिकार लोकांना मिळावा त्यासाठी शासन प्रभावि तरतुदीचा प्रयत्न करेल. तर बेकारी, वृद्धत्व, आजार, विकलांगताच्या स्थितीत सहाय्य दिले जाईल यासाठी तरतूद करेल. | (समाजवादी तत्त्व) |
| ४२ | कामाबाबत न्याय्य व मानवोचित परिस्थिती आणि प्रसूती साहाय्य यांची तरतूद | (समाजवादी तत्त्व) |
| ४३ | कामगारांकरिता निर्वाह वेतन, इ. | (गांधीवादी तत्त्व) |
| ४३ अ | उद्योगधंदे प्रशासनामध्ये कामगारांचा सहभाग | (समाजवादी तत्त्व) |
| ४३ ब | सहकारी संस्था निर्मिती व संचालन यासाठी प्रोत्साहन – ९७ वी घटनादुरुस्ती २०११ | (गांधीवादी तत्त्व) |
| ४४ | नागरिकांकरिता समान नागरी कायदा | (उदारमतवादी तत्त्व) |
| ४५ | ६ वर्षाखालील बालकांकरिता मोफत व सक्तीचे शिक्षण | (उदारमतवादी तत्त्व) |
| ४६ | अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती व दुर्बलेतर वर्गाचे शैक्षणिक व आर्थिक हित | (गांधीवादी तत्त्व) |
| ४७ | पोषणमान व राहणीमान उंचावणे व आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य (उदा. दारुबंदी व गुटखा बंदी) | (गांधीवादी तत्त्व) |
| ४८ | १) कृषी व पशुसंवर्धन यांची सुसूत्र व्यवस्था<br>२) कृषी व पशुपालन आधुनिक व वैज्ञानिक पध्दतीने करणे. (गोमास विक्रीबंदी कायदा) | (गांधीवादी तत्त्व)<br>(उदारमतवादी तत्त्व) |
| ४८ अ | पर्यावरण संरक्षण व अरण्ये, वन्यजीव यांचे संरक्षण करणे. | (उदारमतवादी तत्त्व) |
| ४९ | राष्ट्रीय स्मारके, स्थाने व वास्तू यांचे सरंक्षण | (उदारमतवादी तत्त्व) |
| ५० | न्यायांगाची शासनांगापासून फारकत | (उदारमतवादी तत्त्व) |
| ५१ | आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन | (उदारमतवादी तत्त्व) |

- सरकारवर नैतिक दबाव राखण्यासाठी भारताच्या राज्यघटनेत या तत्त्वांचा समावेश केला आहे.
- ही मार्गदर्शक तत्त्वे राज्यकारभार चालवण्यासाठी दिशा देणारी महत्त्वाची मूल्ये आहेत.
- सामाजिक विषमता नष्ट व्हावी, व्यक्ती व व्यक्तीगटांना समान संधी व समान दर्जा प्राप्त व्हावा ही या धोरणांमागची भूमिका होती.
- मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे सरकारला दिलेले सकारात्मक आदेशच आहेत.
- येथे 'राज्य' ही संज्ञा व्यापक अर्थाने वापरली असून त्यामध्ये घटनेने निर्माण केलेल्या सर्व सत्तास्थानांचा समावेश होतो.
- भारतात सामाजिक व आर्थिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी मार्गदर्शक तत्त्वांची तरतूद घटनेत करण्यात आली आहे.
- मार्गदर्शक तत्त्वांवर गांधीवादी, उदारमतवादी व समाजवादी विचारसरणींची छाप पडली आहे.
- सध्या भारतीय राज्यघटनेत १८ मार्गदर्शक तत्त्वे आहेत. मार्गदर्शक तत्त्वे आयरिश राज्यघटनेतून घेण्यात आली.
- मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरुप होकारात्मक आहे. त्यांचे शासनाने पालन केले नाही तरी न्यायालयाकडे दाद मागता येत नाही. ते न्यायप्रविष्ट नाहीत.

- मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे :-
  १) आर्थिक तत्त्वे
  २) राजकीय तत्त्वे
  ३) परराष्ट्र संबंध विषयक तत्त्वे
  ४) सामाजिक तत्त्वे
  ५) पर्यावरण विषयक तत्त्वे

## ➢ मार्गदर्शक तत्त्वांमधील अनुज्ञा (Sanction)

- जरी मार्गदर्शक तत्त्वे न्यायप्रविष्ठ नसले तरी घटनेचे (कलम ३७) पूर्णपणे स्पष्ट करते की, देशाच्या प्रशासनात ही तत्त्वे मुलभूत आहेत आणि कायदे करतांना या तत्त्वांचे अनुसरण करणे हे राज्यसंस्थेचे कर्तव्य आहे. त्यामुळे ही तत्त्वे त्यांच्या उपाययोजनासाठी राज्यसंस्थेवर एक प्रकारचे नैतिक बंधन निर्माण करतात.
- घटनाकर्त्यांनी मार्गदर्शक तत्त्वे न्यायप्रविष्ट न बनविण्यामागे त्यांच्या पुढील कारणे सांगितली होती.
  १) अंमलबजावणीसाठी आवश्यक वित्तीय संसाधनांची देशाकडे कमतरता होती.
  २) देशातील प्रचंड विविधता व मागासलेपणा त्यांच्या अंमलबजावणीच्या मार्गात येईल अशी भिती होती.
  ३) नव्याने स्वतंत्र झालेल्या देशासमोर (भारतासमोर) विविध समस्या होत्या.
  e.g. १) शब्द अखंड ठेवणे., २) राजकीय समस्या, ३) लोकशाही रुजवणे.

## ➢ मार्गदर्शक तत्त्वाची भूमिका -

१. **आर्थिक व सामाजिक लोकशाही** प्रस्थापित करतात. तसेच, ती **न्यायालयासाठी** एक उपयुक्त **दीपस्तंभ** म्हणून कार्य करतात. **न्यायालयांना** आपल्या **न्यायिक पुनर्विलोकनाच्या अधिकाराच्या प्रभावी वापरासाठी** त्यांचा उपयोग झाला आहे.
२. ही तत्त्वे **प्रास्ताविकेतील तत्त्वांचे विस्तारण** (amplify) करतात.
३. ही तत्त्वे सत्ताबद्दल झाली तरी राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत देशी व विदेशी धोरणांमध्ये स्थैर्य व सातत्यास प्रोत्साहन देतात.
४. ही तत्त्वे नागरिकांच्या **मुलभूत हक्कांना पुरक** कार्य करतात. त्यांच्या अंमलबजावणीमुळे मूलभूत हक्कांच्या पूर्ण व योग्य उपभोगासाठी अनुकूल वातावरण निर्माण होते.
५. **सरकारच्या कामकाजाचे परीक्षण** या तत्त्वांच्या आधारे करता येते.

## ➢ मार्गदर्शक तत्त्वांची उपयुक्तता -

- Although, they are not judiciable घटनेने त्यांची उपयुक्तता घोषित केली आहे की, देशाच्या प्रशासनात तत्त्वे मूलभूत आहेत. त्यांच्या उपयुक्ततेबद्दल काही महत्त्वाची मते.
  १) एन. एम. सिंघवी - 'मार्गदर्शक तत्त्व म्हणजे **घटनेला जीवन प्रदान** करणाऱ्या तरतूदी आहेत.'
  २) एम. सी. छगला (माजी सरन्यायाधीश) - (छगला पृथ्वी स्वर्ग) (सिंघवी जीवन) 'जर ह्या तत्त्वांची पूर्ण अंमलबजावणी करण्यात आली तर देश **पृथ्वीवरील स्वर्ग** बनेल.'
  ३) बी. एन. राव - मार्गदर्शक तत्त्वे ही राज्यसंस्थेच्या प्राधिकारांसांठी **नैतिक तत्त्वे** आहेत, त्यांच्यात **किमान शैक्षणिक मुल्य** आहे.
  i) नैतिक तत्त्वे, ii) किमान शैक्षणिक मुल्य

## ➢ मार्गदर्शक तत्त्वानुसार -

संविधान सभेच्या काही सदस्यांनी व घटना तज्ज्ञ व्यक्तींनी मार्गदर्शक तत्त्वांवर पुढील टिका केली आहे.
१) गैर - न्यायप्रविष्ट (Non - judiciable) नसल्याने विविध प्रकारे टिका
उदा. नववर्षाचा निश्चय (New - year resolutions)
**टी. टी. कृष्णमाचारी** - भावनांची खरी केराची टोपली
कंटाळवाणा नैतिक उपदेश
[कृष्णमचारी (k) - केराची टोपली (k) तसेच कंटाळवणा (k)]

२) त्यांची रचना अतार्किक
- ही तत्त्वे योग्य रीतीने व क्रमाने मांडण्यात आली नाही.
- सामाजिक व आर्थिक विषयांमध्ये कमी महत्त्वाच्या मुद्यांचा समावेश
- जुन्या व नव्या तरतुदींचे मिश्रण
- सातत्यपूर्ण तत्त्वज्ञानांचा अभाव इत्यादी त्रुटी दिसून येतात.

३) घटनात्मक संघर्ष - के. संथानम यांच्या मते या तत्त्वांनी
i) केंद्र - राज्य यांमध्ये
ii) राष्ट्रपती - पंतप्रधान यांमध्ये
iii) राज्यपाल- मुख्यमंत्री यांमध्ये
} घटनात्मक संघर्ष निर्माण केला.
(के संथानम - घटनात्मक संघर्ष)

# मूलभूत हक्क व राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे यातील फरक

| मूलभूत हक्क | राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे |
|---|---|
| • हक्क म्हणजे माणूस व नागरिक या नात्याने केलेल्या न्याय्य मागण्या व अधिकार आहेत.<br>• मूलभूत हक्काद्वारे राजकीय लोकशाही प्रस्थापित होते.<br>• मूलभूत हक्क व्यक्तीच्या हक्कांचे संरक्षण करतात. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी हक्कांची आवश्यकता असते.<br>• मूलभूत हक्क अमर्याद नाहीत. हक्कांवर काही मर्यादा, बंधने आहेत. या हक्कांना अपवाद आहेत.<br>• मूलभूत हक्क बजावणीयोग्य आहेत. मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास हक्क परत मिळवण्यासाठी न्यायालयाकडे दाद मागता येते. मूलभूत हक्कांना संविधानाचे संरक्षण लाभले आहे.<br>• मूलभूत हक्क आणीबाणीच्या काळात स्थगित केले जाऊ शकतात.<br>• मूलभूत हक्कांचे स्वरुप नकारात्मक आहे. राज्याने नागरिकांमध्ये कोणत्याही आधारावर भेदभाव करु नये, त्यांचे स्वातंत्र्य व समता हिरावून घेऊ नये. अशा प्रकारे हक्क सरकारवर मर्यादा आणतात. | • राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे ही राज्यकारभार करताना सरकारसमोरील आदर्श व मार्गदर्शक तत्त्वे आहेत.<br>• मार्गदर्शक तत्त्वांच्या साहाय्याने आर्थिक व सामाजिक लोकशाहीची प्रस्थापना होते.<br>• मार्गदर्शक तत्वे सामाजिक विकासासाठी आवश्यक आहेत. या तत्त्वातून सामाजिक कल्याणाचा विचार केला आहे.<br>• मार्गदर्शक तत्त्वांवर कोणत्याही मर्यादा अथवा बंधने नाहीत.<br>• मार्गदर्शक तत्त्वे बजावणीयोग्य नाहीत. म्हणजे जर यातील हक्क नागरिकांना मिळाले नाहीत तर त्याविरोधात न्यायालयात दाद मागता येत नाही.<br>• मार्गदर्शक तत्त्व आणीबाणीच्या काळात स्थगित केली जाऊ शकत नाहीत.<br>• मार्गदर्शक तत्त्व सकारात्मक स्वरुपाची आहेत, ते निर्णय कर्त्याशासनासाठी सकारात्मक आदेश आहेत. |

## ➢ समान नागरी कायदा (कलम ४४) :-

- भारतातील इंग्रजी राजवटीचे धर्माच्या आधारावर शासन न करता सर्वधर्मीय नागरिकांना समान कायदे केले व धर्मनिरपेक्ष राज्याचा पाया घातला. १८५७ च्या बंडानंतर, राणीच्या जाहीरनाम्यात धार्मिक बाबतीत सरकार हस्तक्षेप करणार नाही असे म्हटले तरी, त्यानंतरच्या काळात अतिशय महत्त्वाचे कायदे इंग्रजांनी केले व त्याद्वारे काही धार्मिक नियम मोडीत काढले.
- भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्त्व करणाऱ्यांनी पाश्चात्त्य उदारमतवादी विचारसरणी आणि लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता अशा मूल्यांचा स्वीकार केला होता. १९३१ साली कराची येथे झालेल्या राष्ट्रसभेच्या अधिवेशनात स्वातंत्र्यानंतरच्या आपल्या शासनव्यवस्थेचे चित्र रेखाटणारा एक ठराव मंजूर झाला. त्यात भारताचे शासन हे धर्मनिरपेक्ष राहील आणि धार्मिक श्रध्दा, आचार व विचार यांचे सर्व नागरिकांना स्वातंत्र्य राहील असे नमूद केले होते.

- या पार्श्वभूमीवर राज्यघटनेत कलम ४४ समाविष्ट केले गेले हे लक्षात येते. इंग्रजी राजवटीपासून भारतातले कुटुंब कायदे थिजल्यासारखे झाले होते. हे सर्व वैयक्तिक कायदे केवळ धर्मावर आधारित होते म्हणून आक्षेपार्ह नव्हते, तर त्या सर्व कायद्यांवर पुरुषप्रधान व्यवस्थेचा प्रभाव मोठया प्रमाणावर होता आणि स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या तरतूदी त्यात होत्या हा मुख्य आक्षेप होता.
- या कायद्यांचे आधुनिकीकरण करणे घटनाकारांना आवश्यक वाटले. राज्यघटनेत समतेचा अधिकार सर्वांना देण्यात आला आणि धर्म, जात, लिंग यांसारख्या जन्माधिष्ठित कारणांवरुन व्यक्ती – व्यक्तींत पक्षपात होऊ नये, शासनाने व कायद्याने तो करु नये असे सांगितले गेले. मात्र हे कायदे बदलण्याकरिता समाजमानस बदलावे लागणार होते. म्हणून राज्यघटनेने मार्गदर्शक तत्त्वांच्या यादीत ही तरतूद समाविष्ट केली. शासनाने समान नागरी कायदा करण्याकरता प्रयत्न करावेत असे हे मार्गदर्शक तत्त्व आहे.
- अशारीतीने धर्मनिरपेक्ष शासनासाठी एक अत्यावश्यक गोष्ट म्हणजे समान नागरी कायदा. म्हणूनच आपल्या घटनेने कलम ४४ मध्ये राज्याने सर्व नागरिकांच्यासाठी समान नागरी कायदा करण्याचा प्रयत्न करावा, असे म्हटले आहे. तथापि समान नागरी कायद्याचा प्रश्न मुस्लिम आधारित भेदभावमूलक व्यक्तिगत कायदे नष्ट करुन सर्व धर्मांतील स्त्री – पुरुषांना समता बहाल करण्यासाठी आवश्यक आहे. याकडे सोईस्कर दुर्लक्ष करण्यात आले आहे. आजपर्यंत न्यायालयाने अनेकवेळा स्मरण करुन दिले तरी समान नागरी कायदा पारित झाला नाही. शाहबानोच्या खटल्यात (१९८५ – ८६) सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी म्हटले की –
- “ही खेदाची गोष्ट आहे की, आपल्या घटनेतील ४४ वे कलम एक मृत शब्द म्हणून राहिले आहे...
- देशासाठी समान नागरी कायदा करण्यासाठी शासकीय पातळीवर काही पावले उचलली गेल्याचा कोणताही पुरावा नाही. असे गृहीत धरलेले दिसते की, मुस्लिम समाजाने त्यांच्या व्यक्तिगत कायद्यातील सुधारणांबद्दल पुढाकार घ्यावा. समान नागरी कायदा हा वेगवेगळ्या कायद्यांमुळे निर्माण होणाऱ्या परस्परविरोधी निष्ठा बाजूला सारुन राष्ट्रीय ऐक्य घडवून आणेल (मात्र कोणताही एक समाज आपल्या बाजूने काही त्याग करुन मांजराच्या गळ्यात घंटा बांधण्यास तयार होईल असे दिसत नाही.) समान नागरी कायदा तयार करणे ही राज्याची जबाबदारी आहे आणि ती पार पाडण्यासाठी आवश्यक अशी वैधानिक शक्ती त्याच्याजवळ आहे.”
- श्रीमती सरला मुद्‌गल, अध्यक्ष, ‘कल्याणी’ विरुध्द भारतीय संघराज्य आणि इतर (१९९५) या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा विस्तारपूर्वक चर्चा करुन घटनेतील या मार्गदर्शक तत्त्वाकडे राज्याच्या होत असलेल्या दुर्लक्षाकडे लक्ष वेधलेले आहे.
- मुस्लिम व्यक्तिगत कायद्यात एकापेक्षा अधिक पत्नी करण्याची मुभा आहे. याचा फायदा घेण्यासाठी हिंदू धर्मातून इस्लाममध्ये प्रवेश करणाऱ्या एका गृहस्थासंबंधीचा हा खटला आहे. त्याचं हिंदू असताना हिंदू स्त्रीशी झालेले लग्न धर्मांतरानंतरही कायम राहते. त्याच्या पहिल्या पत्नीने, पतीने दुसरे लग्न केल्याबद्दल भारतीय दंडसंहितेच्या कलम ४९४ प्रमाणे फिर्याद नोंदविली. आता आपण मुसलमान असल्यामुळे आपल्याविरुध्द ही फिर्याद चालू शकत नाही, कारण आपले दुसरे लग्न कायदेशीर आहे, अशी त्याची भूमिका होती. सर्वोच्च न्यायालयाने त्याचा हा बचाव फेटाळून लावला. एखादा हिंदू-मुसलमान झाल्यामुळे त्याच्या हिंदू पत्नीला व मुलाला असलेले अधिकार संपुष्टात येत नाहीत. त्याने दुसरे लग्न केल्यास त्याच्याविरुध्द फिर्याद करण्याचा त्याच्या पत्नीला अधिकार आहे. या निर्णयाच्या वेळी न्यायमूर्ती कुलदीपसिंग यांनी शाहबानो आणि बाई ताहेरा (१९७९) या दोन्ही खटल्यांत शासनाला दिलेल्या निर्देशाचा उल्लेख केला.
- लिली थॉमस विरुध्द भारतीय संघराज्य (२०००) या खटल्यात सरला मुद्‌गलच्या उपनिर्दिष्ट खटल्यातील निकालामुळे धार्मिक स्वातंत्र्याचा भंग होतो, अशी तक्रार करण्यात आली. न्यायमूर्ती सागीर अहमद व न्यायमूर्ती आर. पी. सेठी यांच्या खंडपीठाने हा दावा फेटाळून लावला. एका व्यक्तीला (येथे मुस्लिम झालेल्या पतीला) आपल्या धर्मस्वातंत्र्याच्या नावाखाली दुसऱ्याच्या धर्मस्वातंत्र्यावर (येथे त्याच्या हिंदू पत्नीला) आक्रमण करण्याचा अधिकार नाही, असे न्यायालयाने निःसंदिग्ध शब्दांत सांगितले.
- थोडक्यात अजुनही हा कायदा लागू झाला नाही.
- नुकताच सोहराबानो यांनी ट्रिपल तलाक बद्दल याचिका दाखल केली आहे.

## भाग ४-A (मूलभूत कर्तव्ये)

| | भाग चौथा अ : मूलभूत कर्तव्ये |
|---|---|
| ५१ अ | मुलभूत कर्तव्ये |

- भारतीय राज्यघटनेत सध्या १० + १ = ११ मुलभूत कर्तव्ये आहेत.
- मूलभूत कर्तव्ये हे जपान या देशाकडून घेण्यात आली. मूलभूत कर्तव्यांचे पालन जनतेने करावे अशी अपेक्षा असते. मूलभूत कर्तव्यांचे पालन जनतेने केले नाही तर त्या विरोधात न्यायालयात दाद मागता येत नाही.

- मुलभूत अधिकार आणि कर्तव्ये ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.
- **स्त्रोत** – रशियाच्या राज्यघटनेमध्ये
- भांडवलशाही देशामध्ये अमेरिका, कॅनडा, फ्रॅन्स, जर्मनी, ऑस्ट्रीया या देशामध्ये मुलभूत कर्तव्ये नाहीत. (अपवाद - जपान)

## ❖ स्वर्णसिंग समिती :

- पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आपल्या मंत्रिमंडळातील संरक्षण मंत्री स्वर्ण सिंग यांना मूलभूत कर्तव्याबद्दल नेमलेल्या कमिटीचे अध्यक्षपद दिले. त्यांनी पुढील शिफारशीसुध्दा केल्या होत्या.
    १) मतदान करणे.
    २) कर भरणे.
    ३) राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान केल्यास दंड
    ४) कुटुंबनियोजन

  ८ कर्तव्ये स्वर्णसिंग समितीने केलेल्या शिफारशीनुसार स्विकारली.
- वरील शिफारसी लागू झाल्या नाहीत.
- १९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीनुसार १० मूलभूत कर्तव्य समाविष्ट करण्यात आली. त्यानंतर ८६ व्या घटनादुरुस्तीनुसार (२००२) ११ वे कर्तव्य समाविष्ट केले. (K)

| | | |
|---|---|---|
| १) संविधान, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा आदर करणे. | - | A |
| २) स्वातंत्र्य लढयातील उदात्त आदर्शांचे जतन व पालन करणे. | - | B |
| ३) देशसेवा व देशाचे संरक्षण करण्यास तयार राहणे. | - | C |
| ४) देशाची एकता, सार्वभौमत्व व एकात्मता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे. | - | D |
| ५) भेदभाव न करणे, स्त्रियांना प्रतिष्ठा प्राप्त करुन देणे. | - | E |
| ६) आपल्या संमिश्र संस्कृतीचा वारसा जतन करणे. | - | F |
| ७) नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करणे, प्राणीमात्रांबद्दल दयाबुध्दी बाळगणे. | - | G |
| ८) मानवतावाद आणि शोधक बुध्दी, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन यांचा विकास करणे. | - | H |
| ९) व्यक्तीगत आणि सामुदायिक अशा सर्व कार्यक्षेत्रात यश मिळवण्यासाठी झटणे. | - | I |
| १०) हिंसाचारापासून दूर रहाणे व सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे. | - | J |
| ११) ६ ते १४ वयोगटातील मुलामुलींना त्यांच्या पालकांनी शिक्षणाची संधी द्यावी. (८६ वी घटनादुरुस्ती २००२) | - | K |

## ❖ मूलभूत कर्तव्यांची वैशिष्टये :-

१) त्यांपैकी काही नैतिक कर्तव्ये आहेत, तर काही नागरी कर्तव्ये आहेत. उदा. स्वातंत्र्यलढयाच्या उदात्त आदर्शांची जोपासना हे एक नैतिक कर्तव्य आहे, तर घटना, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा सन्मान करणे. हे नागरी कर्तव्य आहे.

२) त्यांमध्ये भारतीय परंपरा, धर्म आणि पध्दतींचा विचार करण्यात आला आहे. दुसऱ्या भाषेत, ही कर्तव्ये भारतीय जीवन पध्दतींचा अविभाज्य घटक असलेल्या मूल्यांचे प्रतिक आहेत.

३) मूलभूत हक्क नागरिकांना तसेच परकियांना (अपवाद वगळता) उपलब्ध होतात, मात्र मूलभूत कर्तव्ये केवळ नागरिकांना लागू होतात.

४) मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणेच मूलभूत कर्तव्ये सुध्दा न्यायप्रविष्ट नाहीत. घटनेत न्यायालयाच्या माध्यमातून त्यांच्या अंमलबलावणीची तरतूद नाही. तसेच त्यांच्या उल्लंघनाविरुध्द न्यायिक अनुज्ञा उपलब्ध नाही. मात्र, संसद एखाद्या कायद्याद्वारे त्यांची अंमलबजावणी करु शकते.

५) मुलभूत कर्तव्याच्या पूर्नपरिक्षणासाठी वर्मा समिती १९९९ मध्ये नेमण्यात आली होती.

6) **वर्मा समिती अहवाल - 1999 वर्मा समितीच्या अहवालानुसार काही मूलभूत कर्तव्ये पाळण्यासाठी आधीच काही वैधानिक तरतुदी आहेत. 1) राष्ट्रध्वज, भारतीय राज्यघटना आणि राष्ट्रगीताबद्दल कोणताही तिरस्कार न दाखवता त्याचा आदर केला पाहिजे. 2)भेदभाव, जात किंवा धर्म आणि इतर कोणत्याही आधारावर भेदभाव प्रतिबंधित आहे. 3) आयपीसीच्या तरतुदीनुसार राष्ट्रीय एकतेला नुकसान पोहोचविणारी कामे दंडनीय आहेत. 4) धर्माशी संबंधित आक्रमक उपक्रम आयपीसीच्या कलमानुसार दंडनीय आहेत.**

★★★★★★★★★★★★★★★★★★★★